❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३१९ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



विकास करून महान गडचिरोली बनवून दाखवू

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास : लॉयड्सच्या कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे लोकार्पण



■ गडचिरोली (दै. संध्या)

खनिज संपत्तीने समृद्ध असलेल्या गडचिरोलीचे आम्हाला शोषण नाही तर दोहन करायचे आहे. शाश्वत विकास हे आमचे लक्ष्य आहे. या क्षेत्राचा सर्वांगीण विकास करून भविष्यात महान गडचिरोली बनवून दाखवू, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

लॉईडस अँड मेटल एनर्जी ली. तर्फे बोदली येथे उभारण्यात आलेल्या लॉईडस मिशन फॉर ग्लोबल स्किल्स अँड एंटरप्रेनरशिप केंद्राचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. केंद्रीय आदिवासी कार्यमंत्री जुअल ओराम यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. लॉयड्सने गडचिरोली परिसरात केलेला विकास हा नफा केंद्रित नव्हे तर माणूस केंद्रित असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, समाजाला सोबत घेऊन जेव्हा सर्वसमावेशक विकासाकडे जातो, तेव्हा सोशल प्रॉफिट म्हणजे समाजाचे आशीर्वाद मिळतात. ते काम लॉयड्सच्या माध्यमातून येथे होत आहे. जे कधी काळी नक्षलवादी होते ते आता प्रशिक्षण घेऊन कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. वेगवेगळ्या उद्योगांस लागणारे मनुष्यबळ या केंद्रात तयार होत आहे. पाच वर्षापूर्वी येथे यायला घाबरायचे आज येथील तरुणी विदेशात जाऊन तेथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणार आहेत, हा बदल आहे. येथे येत असलेल्या उद्योगांमुळे थोडी बहुत झाडे कापावी लागली तरी, वनांचे रक्षण झाले पाहिजे. त्यामुळेच गडचिरोलीत ५ कोटी झाडे लावण्याचा संकल्प आम्ही केला व त्यापैकी एक कोटी झाडे लावली असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. हरित गडचिरोली अधिक हरित करण्याचे काम आम्ही करू, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. यावेळी केंद्रीय मंत्री ओराम यांचेही भाषण झाले. प्रास्ताविक लॉयड्सचे प्रबंध संचालक बी. प्रभाकरन यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अडीच हजार नियुक्ती पत्रांचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले.ॲडव्हान्स मिनरल प्रोसेसिंग वर्कशॉप, लॉयडस सेंट्रल किचन, ग्रीवन्स रिड्रेसल पोर्टल या उपक्रमांचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला गडचिरोलीचे खा. नामदेव किरपान, आ. धर्मराव बाबा आत्राम, आ. डॉ. मिलिंद नरोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गडचिरोलीतील स्थानिक तरुण आणि महिलांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम आणि स्वावलंबी बनवणे हा या केंद्राचा मुख्य उद्देश आहे.

उपलब्ध प्रमुख प्रशिक्षण अभ्यासक्रम


- तांत्रिक आणि अभियांत्रिकी कौशल्ये – वेल्डिंग, इलेक्ट्रिकल, सोलर तंत्रज्ञान, प्लंबिंग, एमईपी आणि दुचाकी वाहन दुरुस्ती.
- बांधकाम आणि सुरक्षा – बांधकाम, गवंडीकाम, बार बेंडिंग आणि सुरक्षा रक्षक.
- लॉजिस्टिक्स आणि ड्रायव्हिंग – हलकी व जड वाहने चालविणे, वेअरहाउस असोसिएट, आणि सप्लाय चेन.
- हॉस्पिटॅलिटी आणि डिजिटल कौशल्ये – हॉटेल मॅनेजमेंट, पाककला, फूड अँड बेव्हरेज, फ्रंट ऑफिस, हाऊसकीपिंग, पर्यटन आणि मूलभूत डिजिटल कौशल्ये.
- उद्योजकता विकास – स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारे मार्गदर्शन आणि प्रशिक्षण.

'जोश' चित्रपट गाजवणारा खलनायक आर्थिक अडचणीत

■ मुंबई (दै. संध्या)

बॉलिवूड अभिनेता शरद कपूर सध्या अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहे. काही दिवसांपूर्वीच त्याने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करत बॉलिवूडमधील वरिष्ठ कलाकारांकडे काम आणि मदतीसाठी आर्त हाक दिली होती. त्याच्या या भावनिक आवाहनानंतर आता बॉलिवूडचा भाईजान सलमान खान आणि सोनू सूद मदतीसाठी पुढे सरसावले आहेत.

एकीकडे सलमान खानने शरद कपूरशी संपर्क साधून विचारपूस करत पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले आहे, तर दुसरीकडे सोनू सूदने शरद कपूरच्या पायाच्या दुखापतीवर उपचार करण्यासाठी थेट डॉक्टरांची एक टीम पाठवली आहे. गेल्या काही दिवसांपासून शरद कपूरकडे कोणतेही काम नसल्याने तो आर्थिक अडचणीतून जात आहे. अशा परिस्थितीत मुलांप्रमाणे वाढवलेले पाळीव कुत्रे त्याला एका प्राण्यांसाठी काम करणाऱ्या एनजीओमध्ये पाठवावे लागले होते. त्याचा भावनिक व्हिडीओदेखील सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला होता. शरद कपूर याने एका व्हिडीओच्या माध्यमातून सलमान खान, शाहरुख खान आणि अक्षय कुमार यांसारख्या बड्या कलाकारांकडे मदतीची मागणी केली होती. आपण आर्थिक, मानसिक आणि नैतिकदृष्ट्या कठीण काळातून जात असून आपल्याला कामाची नितांत गरज असल्याचे त्याने सांगितले होते. याची दखल घेत सलमान खानने शरद कपूरशी संवाद साधला आणि त्याला सर्वतोपरी मदत करण्याचा विश्वास दिला आहे. तर, गरजूंच्या मदतीला नेहमी धावून जाणाऱ्या सोनू सूदने शरद कपूरच्या पायाच्या दुखापतीवर योग्य उपचार व्हावेत यासाठी डॉक्टरांचे पथक पाठवले आहे. बार्सिलोना येथे फुटबॉल खेळताना शरदच्या पायाला गंभीर दुखापत झाली होती, त्यामुळे डॉक्टरांनी त्याला विश्रांतीचा सल्ला दिला आहे. काही दिवसांपूर्वी शरद कपूरने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करत आपली व्यथा मांडली होती.



■ पाळीव कुत्रेही एनजीओकडे पाठवले; मदतीला सलमान खान आणि सोनू सूद धावले

थोडक्यात...

महेश भागवत हैदराबादचे पोलीस आयुक्त

मुंबई : दैनिक संध्या

महाराष्ट्राच्या मातीतील अनेक अधिकारी देशसेवेत आपल्या कर्तव्याचा ठसा उमटवत आहेत. त्यामध्ये, आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या माध्यमातून विविध राज्यात उल्लेखनीय कार्य केले जात आहे. त्यापैकीच एक नाव म्हणजे आयपीएस तथा युपीएससी विद्यार्थ्यांचे मेंटर महेश भागवत. मूळ अहिल्यानगरच्या पाथर्डीचे असलेल्या महेश भागवत यांची 'हैदराबाद पोलीस आयुक्त'पदी नियुक्ती झाली आहे. तेलंगणा सरकारने 21 आयपीएस अधिकाऱ्यांची खांदेपालट केली असून व्ही.सी. सज्जनार यांच्याजागी महेश भागवत यांची हैदराबाद पोलीस आयुक्तपदी बदली करण्यात आली. त्यामुळे, मूळ पाथर्डीचे असलेल्या भागवत यांचे महाराष्ट्रासह देशभरातून अभिनंदन होत आहे. हैदराबादचे पोलीस आयुक्त असलेल्या व्ही.सी. सज्जनार यांनी फायर अँड डिजास्टर रिस्पॉन्सच्या महानिरीक्षक पदावर बदली करण्यात आली असून स्पेशल प्रोटेक्शन फोर्सच्या प्रमुखपदाचाही अतिरिक्त पदभार त्यांच्याकडे देण्यात आला आहे. तर, हैदराबाद पोलीस आयुक्तपदी महेश भागवत यांची नियुक्ती करण्यात आली. 13 नोव्हेंबर रोजी बंजारा हिल्स येथील कार्यालयात भागवत यांनी पोलीस आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला. त्यामुळे, ते हैदराबादचे 63 वे पोलीस आयुक्त ठरले आहेत. त्यामुळे, निश्चितच महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. महेश भागवत यांनी हैदराबाद आयुक्तपदी पदभार स्वीकारताच देशभरातून, महाराष्ट्रातून त्यांचे अभिनंदन होत असून नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे यांनीही फेसबुकवर त्यांचे अभिनंदन केले आहे.

तळजाई टेकडी फोडून बांधकामे सुरूच

पुणे : दैनिक संध्या

सिंहगड रस्त्याच्या बाजूने तळजाई टेकडी बेकायदेशीरपणे फोडून तेथे अवैध बांधकामे केली जात आहेत. अनधिकृत नळजोड घेऊन हे पाणी बांधकामासाठी वापरले जात आहे. महापालिकेचे अधिकारी या कृत्याकडे सोईस्कर दुर्लक्ष करत असून, याकडे आयुक्त नवल किशोर राम यांनी लक्ष देऊन कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात स्थानिक नागरिक रोहित कुलकर्णी यांनी निवेदन पाठवून कारवाईची मागणी केली आहे. तळजाई टेकडीच्या बाजूने अथर्वनगर येथे टेकडीफोड सुरू असताना महापालिकेच्या पथकाने २२ ऑक्टोबर रोजी निव्वळ दिखाऊ कारवाई केली. कारवाईपूर्वीच यंत्रसामग्री तेथून हटवण्यात आली होती. यात अधिकाऱ्यांचे संगनमत आहे. या परिसरात मुरुम आणि गौण खनिजाची चोरी करून लाखो रुपयांच्या महसुलाचे नुकसान केले जात आहे. बांधकामांसाठी अवैध नळजोड घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रचंड गैरवापर होत आहे. यामुळे भविष्यात या भागात गंभीर पाणीटंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली असून, या प्रकरणात तातडीने कारवाई करावी अशी मागणी कुलकर्णी यांनी केली आहे.

छठपूजेसाठी जुहू चौपाटीवर उत्तर भारतीयांची मोठी गर्दी, पर्यटकांना प्रवेश बंदी

■ मुंबई (दै. संध्या)

गेल्या काही दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या छठपूजेच्या वादानंतरही आज उत्तर भारतीय नागरिकांनी मोठ्या उत्साहात ठिकठिकाणी छठपूजा साजरी केली. मुंबईतील जुहू चौपाटीवर छठ पूजेसाठी भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. संध्याकाळी सहा साडेसहाच्या सुमारास सूर्यास्त होणार आहे, त्यावेळी भाविकांकडून अर्घ्य दिला जातो. त्यामुळे, सूर्यास्तापूर्वी जुहू चौपाटीवर महिला भाविकांनी मोठी गर्दी केली होती. गेल्या काही दिवसांपूर्वी मुंबईतील रेल्वे आणि मेट्रो स्थानकावर छठपूजेची गाणी वाजल्याने मनसेनं संताप व्यक्त केला होता. त्या पार्श्वभूमीवर पोलिसांचाही कडक बंदोबस्त तैनात आहे. छठ पूजेनिमित्त आज मुंबईच्या जुहू चौपाटी येथे इतर पर्यटकांना बंद करण्यात आले होते. जुहू चौपाटीवर येणाऱ्या पर्यटकांना थांबवला जात असल्याचं दिसून आलं. आज छठ पूजा असल्यामुळे जुहू चौपाटीवर फक्त छठ पूजेसाठी येणाऱ्या भाविकांनाच प्रवेश दिला जात होता. तर, राज्यातील इतर जिल्ह्यातही उत्तर भारतीय नागरिकांनी छठपूजा साजरी केल्याचं दिसून आलं. छठपूजेनिमित्त नाशिकच्या रामकुंड गोदावरी नदीच्या काठावर उत्तर भारतीयांची मोठी गर्दी दिसून आली. तर, बदलापूरच्या छठपूजा स्थळावर पोलिसांचा तगडा बंदोबस्त पाहायला मिळाला. नाशिकमध्येही मावळत्या सूर्याला अर्घ्य देण्यासाठी उत्तर भारतीय महिला भाविकांची गोदातिरी रामकुंडावर मोठी गर्दी होती. उत्तर भारतीयांमध्ये छठपूजेला विशेष महत्त्व असते. उत्तर भारतीय महिलांकडून गोदावरी तीरावर पूजा विधी सुरू असल्याचं दिसून आलं. छठी मैयाचे विधिवत पूजन करण्यात आले. रामकुंडावर उत्तर भारतीय नागरिक मोठ्या संख्येने दाखल झाले होते. विशेष म्हणजे, रामकुंडावर कुंभमेळाप्रमाणे भाविकांची मोठी गर्दी दिसून आली. आज मावळत्या सूर्याला तर उद्या उगवत्या सूर्याची पूजा करून उपवास सोडला जातो. छठपर्व हा चार दिवसांचा असतो. बदलापुरात होणाऱ्या छठपूजेला मनसेने विरोध दर्शविला होता. त्याच पार्श्वभूमीवर आज बदलापुरातील उल्हास नदीकाठी होणाऱ्या छटपूजेच्या अनुषंगाने पोलीस प्रशासनाने तगडा बंदोबस्त लावलाय.



■ नाशिकच्या रामकुंडावरही उत्साह

दिल्लीतील भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा

महाराष्ट्र दालनाचे उद्योगमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन; महाराष्ट्राच्या उद्यमशीलतेचे ६४ स्टॉल्सच्या माध्यमातून प्रदर्शन

■ नवी दिल्ली, (दै. संध्या)

नवी दिल्ली येथे आयोजित भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा-२०२६ मध्ये महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षमता, उद्योजकीय कौशल्य आणि समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविणाऱ्या भव्य महाराष्ट्र पॅव्हिलियनचे उद्घाटन आज उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते भारत मंडपम, प्रगती मैदान येथे झाले. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा महिला बचत गट, 'एक जिल्हा एक उत्पादन' उपक्रमातील सहभागी आणि लघुउद्योजकांच्या उलाढालीत दुप्पट ते तिप्पट वाढ अपेक्षित असल्याचे उद्योगमंत्र्यांनी सांगितले. उद्घाटनप्रसंगी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव डॉ. श्वेता सिंघल, निवासी आयुक्त (गुंतवणूक) सुशील गायकवाड, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशाली दिघावकर, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनानंतर माध्यमांशी संवाद साधताना उद्योगमंत्री सामंत म्हणाले की, मागील वर्षी भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यात महाराष्ट्रातील महिला बचत गट, 'एक जिल्हा एक उत्पादन' उपक्रम आणि लघुउद्योजकांनी सुमारे ७ ते ८ कोटी रुपयांची उलाढाल केली होती. यंदा महाराष्ट्र पॅव्हिलियनला मिळणारा प्रतिसाद आणि सहभागी उद्योजकांची संख्या लक्षात घेता ही उलाढाल दुप्पट ते तिप्पट होण्याची अपेक्षा आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'एक जिल्हा एक उत्पादन' संकल्पनेनुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने व्यापक बाजारपेठेत पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. याच उद्देशाने महाराष्ट्र पॅव्हिलियनमध्ये ६४ स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. या स्टॉल्सच्या माध्यमातून महाराष्ट्रातच उत्पादन करणाऱ्या स्थानिक उद्योजकांना आणि महिला बचत गटांना आपली उत्पादने प्रदर्शित व विक्री करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.



रुपाली चाकणकरांचे नाव, फोटो अन् स्टाईलवर ट्रेडमार्क

आ बैल मुझे मार... त्यांचा सल्लागार कोण आहे? दिपाली सय्यद यांचा सवाल, बायकांच्या साडीचाही विषय काढला

■ मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकरांनी स्वतःचा ट्रेडमार्क त्यांचे व्यक्तिगत कॉपी राइट्स आरक्षित केले आहेत. रुपाली चाकणकरांचं नाव, त्यांचा फोटो, त्यांची ओळख, आणि त्यांची वैयक्तिक शैली आणि त्यांची स्वतःला सादर करण्याची विशिष्ट पद्धत आता ट्रेडमार्क असेल आणि त्याची नोंदणी त्यांनी केली आहे. रुपाली चाकणकरांनी स्वतः ट्विट करुन ही माहिती दिली आहे. आपल्या पूर्वपरवानगीशिवाय कोणीही माझे नाव, फोटो, ओळख किंवा माझ्या विशिष्ट शैलीचा स्वतःच्या फायद्यासाठी किंवा व्यावसायिक कारणासाठी करु नये असं आवाहन त्यांनी केलंय. कोणत्याही प्रकारचे फोटो, व्हिडिओ, फिल्म, रील, टीझर, प्रमोशन किंवा इतर कोणतेही साहित्य तयार करण्यासाठी, वापरण्यासाठी किंवा प्रसिद्ध करण्यासाठी वापर केल्यास, अशा व्यक्तीविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला आहे. त्यावरती आता अभिनेत्री दिपाली सय्यदने प्रतिक्रिया दिली आहे.

दिपाली सय्यदने म्हटलंय की, आणखी एकदा आ बैल मुझे मार, ट्रेडमार्क कसला, आता जस्ट पाच नोव्हेंबरला तुम्ही अर्ज केलेला आहे आणि त्याला अजूनही स्क्रुटनी झालेली नाहीये, परमिशन मिळालेली नाहीये. म्हणजे महाराष्ट्रात जितक्या बायका साड्या नेसतायत, त्यांनी साड्या नेसायच्या नाहीत का? ह्या महाराष्ट्रात ज्या गावात मी आहे, लोणावळ्यात आज मी उभी आहे, तिथे या गावातच कितीतरी रूपाली नावाच्या व्यक्ती मुली असतील. म्हणजे त्यांनी ते ते नाव लावायचं नाही का? म्हणजे काय हा कोण आहे तुमचं सल्लागार? हे खूप कुठे ना कुठे तरी चुकीच्या पद्धतीने चाललेलं आहे. पुन्हा एकदा तुम्ही तेच सिद्ध करताय की आ बैल मुझे मार. मी एक कलाकार आहे, मी कलाकार म्हणून काम केलेलं आहे आणि मी एक पोलिटिशियन लेडीचं काम केलेलं आहे आणि मी ते साकारलेलं आहे. तुम्हीच म्हणताय की ती मी आहे, मी आहे, मी आहे. मी आज कितीतरी वर्षांपासून हा क्लिप लावते, कितीतरी वर्षांपासून मी साड्या नेसते. म्हणजे याचा अर्थ ती व्यक्ती मीच झाली का? असं नाही ना कितीतरी, कोणीही घालू शकतात. पुन्हा सांगते मी पुन्हा एकदा तुम्हाला सांगते, पुन्हा एकदा महाराष्ट्राला सांगते का हा विषय भोंदूगिरी विरोधात आहे. भोंदूगिरीला कुठे ना कुठेतरी स्टॉप करायचा आहे आणि हे पुन्हा महाराष्ट्रात घडू नये, पुन्हा महिला या सगळ्या गोष्टीला बळी पडू नये. ही जी जनजागृती आहे तेवढंच आहे आणि हा चित्रपट चित्रपट गृहामध्ये. कोणीही स्टॉप करू शकत नाही येण्यासाठी. तुम्ही ज्या पद्धतीने आम्हाला त्रास देताय आजही ह्या विषयाला घेऊन तुम्ही प्रोपोगंडा करता आहेत. पुन्हा सेन्सॉरमध्ये त्रास चालू झालेला आहे. हा जो त्रास तुम्ही देता आणि हा त्रास भोगतोय आम्ही. आम्ही तरीही देखील ताठपणाने उभे आहोत आणि ताठपणाने सांगतो की चित्रपट चित्रपट गृहात येणार आणि तो महाराष्ट्रभर पसरणार, असा ठाम विश्वासही दिपाली सय्यदने व्यक्त केला आहे. अशातच दिग्दर्शक स्वरुप सावंत यांच्या महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे, याच पार्श्वभूमीवर चाकणकरांचा स्वतःचा ट्रेडमार्क चर्चेत आला आहे. महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स चित्रपटात एक व्यक्तिरेखा रुपाली चाकणकरांशी साधर्म्य साधणारी आहे असं सांगितलं जातंय.



रूपाली चाकणकरांची पोस्ट काय?

माझे नाव,माझा फोटो,माझी ओळख,माझी वैयक्तिक शैली आणि स्वतःला सादर करण्याची माझी विशिष्ट पद्धत यासंदर्भात ट्रेडमार्क नोंदणी करण्यात आलेली आहे. माझ्या पूर्वपरवानगीशिवाय कोणीही माझे नाव, फोटो,ओळख किंवा माझ्या विशिष्ट शैलीचा स्वतःच्या फायद्यासाठी किंवा व्यावसायिक कारणासाठी कोणत्याही प्रकारचे फोटो, व्हिडिओ, फिल्म, रील, टीझर, प्रमोशन किंवा इतर कोणतेही साहित्य तयार करण्यासाठी, वापरण्यासाठी किंवा प्रसिद्ध करण्यासाठी वापर केल्यास, अशा व्यक्तीविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल असे आक्षेपार्ह किंवा बेकायदेशीर साहित्य जप्त करण्याची मागणी केली जाईल आणि संबंधित व्यक्तीला फौजदारी तसेच दिवाणी कायदेशीर कारवाईला व शिक्षेला सामोरे जावे लागेल.

समृद्धी महामार्गावर जीवाशी खेळ!

■ बुलढाणा (दै. संध्या)

राज्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर प्रशासनाकडून प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. अवघ्या दोन दिवसांपूर्वी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा जवळ झालेल्या भीषण अपघातात 20 ते 22 वाहनांचा चुराडा झाला होता. सुदैवाने यात जीवितहानी झाली नसली तरी मोठे आर्थिक नुकसान झाले होते. या गंभीर घटनेनंतरही समृद्धी महामार्ग प्रशासनाला जाग आलेली नाही. सिंदखेड राजा ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान मुंबई कॉरिडॉरवरील चॅनेज 407 वर चक्क गुरांचा एक मोठा कळप महामार्गाच्या मधोमध उभा असल्याचे काही वाहनधारकांना दिसून आले. सुदैवाने सतर्क वाहनधारकांनी वेळीच आपली वाहने थांबवून या गुरांच्या कळपाला बाजूला केले, ज्यामुळे एक मोठा अनर्थ टळला. समृद्धी महामार्ग हा पूर्णपणे 'एक्सेस कंट्रोल'महामार्ग म्हणून ओळखला जातो, जिथे बाहेरील कोणताही प्राणी किंवा व्यक्ती महामार्गावर येऊ नये यासाठी दोन्ही बाजूंनी मजबूत सुरक्षा कुंपण घालण्यात आले आहे. या महामार्गावर वाहनांची वेगमर्यादा 120 किलोमीटर प्रतितास इतकी असते. तब्बल 120 किमी प्रतितास वेगाने धावणाऱ्या वाहनांसमोर अचानक गुरांचा कळप आल्यास वाहनचालकाचे नियंत्रण सुटून भीषण साखळी अपघात होण्याची दाट शक्यता असते. चॅनेज 407 वर हा कळप बाजूला करण्यासाठी काही वाहनधारकांनी आपली वाहने महामार्गावर थांबवली होती. यावेळी पाठीमागून येणाऱ्या भरधाव वाहनांची धडक बसता-बसता राहिली आणि मोठा अपघात थोडक्यात टळला.

संपादकीय

सायबर चोरांचा उच्छाद

महाराष्ट्रात चालू वर्षाच्या (२०२६) पहिल्या आठ महिन्यात सायबर गुन्हेगारांनी नागरिकांना तब्बल २११९. ६९ कोटी रुपयांच्या गंडा घातला आहे.म्हणजेच राज्यात दररोज सरासरी ८. ७२ कोटी रुपयांची सायबर फसवणूक होत आहे. सायबर पोलिसांनी हस्तक्षेप करूनही फसवणुकीतील केवळ ५८७. ४० कोटी रुपये म्हणजेच एकूण रकमेचा २७. ७१टक्के रक्कम वाचवण्यात यश आले आहे. त्यामुळे नागरिकांना पण १५३२. २९ कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले आहे.महाराष्ट्र सायबर च्या नोंदीनुसार यंदा ३१ ऑगस्टपर्यंत संस्थेकडे सायबर फसवणुकीच्या दोन लाख ८ हजार ७६७ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. २०२५ मध्ये एकूण दोन लाख ८४ हजार २८१ तक्रारी दाखल झाल्या होत्या, त्यामध्ये ३५३६. ४२ कोटी रुपयांची फसवणूक झाली होती. त्यापैकी ६१७. ५२ कोटी रुपये वाचवण्यात आलेले होते. सायबर फसवणुकीत गमावलेली रक्कम परत मिळवण्याचे पोलिसासमोरील आव्हान दिवसेंदिवस वाढत आहे. स्मार्टफोन, इंटरनेट, आणि ऑनलाईन सेवा, बँक, नागरिकांच्या खिशात आणली, हा प्रगतीचा भाग आहे. यूपीआय, नेट बँकिंग, आणि मोबाईल बँकिंग मुळे काही सेकंदात पैसा पाठवणे शक्य झाले, पण ॲप वापरता येणे, आणि त्यातील धोके ओळखता येणे, या वेगळ्या बाबी आहेत. डिजिटल साक्षरतेतील ही तफावत गुन्हेगारांसाठी खुले दार ठरत आहे. नव्या ग्राहकांना सुविधेबाबत सुरक्षित वापराचे प्रशिक्षण मिळाले नाही तर वेगवान प्रगती स्वतःची जोखीम वाढवते. बनावट लिंक किंवा नकली संकेतस्थळावर माहिती भरण्यास लावणे, म्हणजेच फिशिंग, हे त्याचे एक रूप. दुसरीकडे भीती, लोभ. किंवा घाई गडबडीची भाषा वापरून वापरकर्त्याकडून संमती मिळवली जाते.बनावट कॉल, फसवे संदेश, आणि कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेले हुबेहुब आवाज, हे फसवणुकीला विश्वासाचा चेहरा देतात. गुन्हेगार आता केवळ यंत्रणाच नव्हे तर माणसाच्याही विश्वासाला भेदतात. ॲप मधील सुरक्षिततेच्या सूचना न वाचताच मंजुरी देण्याची सवयीही या पद्धतीला बळ देते. या सगळ्याची परिणीती म्हणून राज्यात नागरिकांना दररोज साडेआठ कोटीहून अधिक रकमेचा गंडा घातला जात असल्याचे राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार प्रणालीवर आलेल्या ग्राहकाचे तक्रारीवरून दिसून येते. पैसे मिळवण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करायला लावून किंवा यूपीआय विनंती मंजूर करायला लावून प्रत्यक्षात पैसे वळते केले जातात. केवायसी अपडेट करा, अन्यथा खाते बंद होईल, अशी धमकी देणारा बनावट बँक अधिकारी ग्राहकाला घाईत पावले उचलण्यात लावतो. सरकारी अधिकारी, किंवा पोलिसांचे नाव सांगितले की या भीतीमुळे स्वतंत्र पडताळणी मागे पडते. व्यवहारातला तात्पुरता गुप्त क्रमांक म्हणजेच ओटीपी तसेच पिन पासवर्ड किंवा कार्डचा सीव्हीव्ही मिळाल्यास त्याचा वापर करून अनधिकृत व्यवहार होऊ शकतात. बनावट गुंतवणूक योजना ऑनलाइन आर्थिक फसवणुकीमध्ये यूपीआय घोटाळे, कार्डद्वारे फसवणूक,बनावट ग्राहक सेवा क्रमांक, तसेच गुंतवणूक आणि लॉटरीच्या आमिषाचा समावेश होतो. फिशिंगच्या माध्यमातून बनावट ई-मेल, संदेश आणि वेबसाईटचा वापर करून पासवर्ड, ओटीपी आणि बँक खात्याची माहिती चोरली जाते. रन्सम वेअरच्या माध्यमातून वैयक्तिक किंवा व्यावसायिक माहिती लॉक करून ती पुन्हा उपलब्ध करून देण्यासाठी खंडणी मागितली जाते. आधार आणि पॅन कार्ड च्या माहितीचा गैरवापर करून ओळख चोरी केले जाते. ऑनलाइन खरेदीच्या नावाखाली बनावट वेबसाईट आणि आकर्षक ऑफर देऊन ग्राहकांची फसवणूक केली जाते. सायबर स्टॉकिंग, बनावट सोशल मीडिया खाती, ऑनलाईन धमक्या आणि ब्लॅकमेलिंगच्या माध्यमातून नागरिकांना त्रास दिला जातो. बिझनेस ईमेल कॉम्प्रोमाइज या प्रकारात गुन्हेगार कंपनीचे वरिष्ठ अधिकारी किंवा पुरवठादार असल्याचे भासवून कर्मचाऱ्यांना फसवतात. आणि बनावट खात्यामध्ये पैसे हस्तांतरित करण्यास भाग पाडतात. सायबर पोलिसांच्या सूचनेनुसार ग्राहकांनी प्रत्येक खात्यासाठी वेगळा आणि मजबूत पासवर्ड वापरावा. टू फॅक्टर ऑथेंटिकेशन सुरू करावे. कोणतीही माहिती देण्यापूर्वी वेबसाईटचा पत्ता ईमेल पाठवणा-याची ओळख, आणि लिंक तपासावी. मोबाईल, संगणक, आणि सुरक्षा प्रणाली, नियमितपणे अपडेट ठेवाव्यात. फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या क्रमांकावर संपर्क संपर्क साधावा. व तक्रार नोदवावी.ओटीपी, यूपीआय पिन, सीव्हीव्ही किंवा बँकिंग पासवर्ड कोणालाही सांगू नये. संशयास्पद लिंक वर क्लिक करू नये. किंवा अनोळखी अटॅचमेंट डाऊनलोड करू नये. सार्वजनिक वायफायचा वापर करून बँकिंग व्यवहार करू नये. अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून रिमोट अक्सेस किंवा स्क्रीन शेअरिंग ॲप डाऊनलोड करू नये. अवास्तव लॉटरी, नोकरी किंवा कर्जाच्या आमीषाला बळी पडून आगाऊ पैसे देऊ नयेत या स्वरूपाची काळजी घेण्यास सागितले आहे. बनावट गुंतवणूक योजना आणि ऑनलाईन ट्रेडिंग मध्ये सुरुवातीला किरकोळ परतावा देऊन विश्वास निर्माण केला जातो. ॲप वर दिसणारा नफा प्रत्यक्षात हाती पडत नसतो. मोठी रक्कम भरल्यावर पैसे काढण्यासाठी नवनवीन शुल्क मागितले जाते. नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागारांचे किंवा शेअर बाजारातील प्रसिद्ध कंपनीचे नाव वापरल्यास फसवणूक अधिक खरी वाटते. नोकरी, पार्ट टाइम काम, किंवा ऑनलाईन टास्कमध्येही छोटे कमिशन दाखवून मोठे डिपॉझिट भरवले जाते. कमाईच्या आशेने पैसे भरलेल्या माणसाला पुढची रक्कम भरल्याशिवाय आधीचे पैसे मिळणार नाहीत असे सांगितले जाते. डिजिटल अरेस्टमध्ये नकली पोलीस, तपास अधिकारी, किंवा न्यायाधीश, व्हिडिओ कॉल वर व्यक्तीला बाहेर संपर्क न करण्यास सांगतात. त्यामुळे पडताळणीची संधीच उरत नाहीत. बदनामीची, किंवा अटकेची भीती दाखवून पडताळणीसाठी पैसा भरून घेतला जातो. भारतीय कायद्यात अशा डिजिटल अटकेची तरतूद नाही. दुसरीकडे सोशल मीडियाचे खाते ताब्यात घेऊन मित्र, नातेवाईकाकडे,तातडीने मदत मागितली जाते. ओळखीच्या व्यक्तीचा आवाज किंवा व्हिडिओ कृत्रिम रित्या तयार करूनही पैसा उकळला जातो. याला डीप- फेकचा गैरवापर म्हणतात. चोरीला गेलेली वैयक्तिक माहिती, बँकिंग तपशील, आणि ओळखपत्रे, पुन्हा पुन्हा वापरून नवीन फसवणूक किंवा बनावट खाते तयार करता येतात. त्यामुळे एकदाची माहिती दीर्घकाळ धोका निर्माण करते. गुन्हेगार टोळ्यांचे जाळे आंतरराष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय असते. एका राज्यातील बळी,दुसऱ्या राज्यातील गैरव्यवहारासाठी वापरलेले बँक खाते, आणि कधी परदेशातून चालणारा संपर्क, यामुळे ओळख डिजिटल पुरावे, आणि पैशाचा माग काढणे अवघड होते. पुरावा मिळण्यास उशीर झाला तर पैसा अनेक खात्यातून पुढे सरकलेला असतो. आयुष्यभराची बचत काही मिनिटात गमावण्याचा धक्का केवळ बँक खात्यातून पुरता मर्यादीत नसतो ज्येष्ठांची औषधासाठीची तरतूद, नोकरदाराचा पगार,महिलांची स्वतंत्र बचत, विद्यार्थ्यांची फी, आणि व्यवसायिकांचे खेळते भांडवल एका फटक्यात धोक्यात येऊ शकते. कर्ज काढून किंवा तातडीच्या गरजेसाठी जमवलेला पैसा गेल्यावर आर्थिक संकट दुप्पट होते. तणाव, नैराश्य, कौटुंबिक वाद, आणि लोक काय म्हणतील?ही भीती तक्रारीसाठी उशीर लावू शकते. नुकसान भरून निघाले नाही तर मुलाबाळाचे शिक्षण, आरोग्य उपचार, किंवा व्यवसायाच्या नियोजनावर त्याचा गंभीर परिणाम होतो. डिजिटल भारताची प्रगती केवळ व्यवहाराच्या संख्येने नव्हे तर नागरिक किती विश्वासाने व्यवहार करू शकतात?यांनी मोजली गेली पाहिजे. तंत्रज्ञाचा विकास थांबवणे हे या फसवणूकीला उत्तर नाही. त्यासोबत सुरक्षितता, जागरुकता, आणि कार्यक्षम पोलिसिंग वाढवणे, हे उत्तर आहे.डिजिटल व्यवस्थेची खरी कसोटी पैसा किती वेगाने फिरतोय हे नाही?....तर तो चुकीच्या हाती गेल्यावर व्यवस्था किती वेगाने जागी होऊन तत्परता दाखवते यात आहे.

घोडेगाव येथे रानभाजी व पारंपरिक खाद्य महोत्सवाचे उद्घाटन

- भगवान बिरसा मुंडा यांचा संघर्ष, त्याग आणि स्वाभिमानाचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी- उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार
- आदिवासी संस्कृती, परंपरा आणि खाद्यसंस्कृतीच्या जतनासाठी शासन कटिबद्ध



■ घोडेगाव (दै. संध्या)

क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या जनजातीय गौरव दिनाच्या माध्यमातून आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, संस्कृती, परंपरा आणि स्वाभिमानाचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत आहे. आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासासह त्यांच्या सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांच्या वतीने क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आणि जनजातीय गौरव दिन कार्यक्रमात दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होत उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते आदिवासी रानभाजी व पारंपरिक खाद्य महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. यावेळी आमदार शरद सोनवणे, आमदार बाबाजी काळे, खेड पंचायत समितीच्या सभापती गौरीताई मुऱ्हे, उपसभापती दिलीप डुबे, ॲड. किरण गभाले, जनजाती सल्लागार समितीचे सदस्य तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगावचे प्रकल्प अधिकारी गणेश इवनाते यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांना अवघ्या २५ वर्षांचे आयुष्य लाभले; मात्र इतक्या कमी वयात किती मोठे कार्य उभे करता येते, हे त्यांनी संपूर्ण जगाला दाखवून दिले. ब्रिटिश सत्ता, सावकारी आणि जमीनदारी व्यवस्थेला आव्हान देत त्यांनी ऐतिहासिक 'उलगुलान' घडवले. हा केवळ इंग्रजांविरोधातील उठाव नव्हता, तर आपल्या हक्कांसाठी, जमिनीसाठी, अस्तित्वासाठी आणि स्वाभिमानासाठी उभारलेला बुलंद आवाज होता. त्यांच्या संघर्षाचा आणि त्यागाचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या जडणघडणीत आणि स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी क्रांतिकारकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. खानदेश आणि सातपुड्यातील भिल्ल बांधवांनी इंग्रजांच्या जुलमाविरोधात पुकारलेला लढा, राघोजी भांगरे आणि रामजी भांगरे यांच्या नेतृत्वाखाली महादेव कोळी समाजाने केलेला उठाव, तसेच वीर बाबुराव शेडमाके यांनी गोंड वीरांची फौज उभारून ब्रिटिशांना दिलेली झुंज हा महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आहे. अन्यायाविरोधात धैर्याने उभे राहिलेल्या या सर्व ज्ञात-अज्ञात क्रांतिवीरांना त्यांनी अभिवादन केले. जनजातीय गौरव दिनानिमित्त राज्यात संपूर्ण आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून आदिवासी समाजाची लोकनृत्ये, लोकसंगीत, हस्तकला, वेशभूषा आणि जीवनशैली संपूर्ण देशासमोर येणार आहे. पूर्वजांनी जपलेला हा समृद्ध सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या उपक्रमांमधून होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शेती, पर्यावरण आणि सामाजिक क्षेत्रात काम केल्यामुळे निसर्गाशी जोडलेल्या जीवनपद्धतीचे महत्त्व जवळून अनुभवले आहे. जल, जमीन आणि जंगलाशी नाते जोडून जगणाऱ्या आदिवासी समाजाकडूनच पर्यावरणप्रेमाची खरी ऊर्जा मिळाली आहे, असेही त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक आदिवासी पाड्यापर्यंत विकास पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सर्वांना सोबत घेऊन चालणारा आणि समाजातील शेवटच्या माणसाचा विचार करणारा शिव- शाहू-फुले- आंबेडकरांचा सर्वसमावेश विचार ही महाराष्ट्राची ओळख आहे. विकासाचा लाभ प्रत्येक गाव, वाडी आणि पाड्यापर्यंत पोहोचला पाहिजे, ही स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची शिकवण होती.

इंद्रायणी नदीकाठचा रस्ता काँक्रिटीकरणानंतर वाहतुकीसाठी खुला होणार

■ आळंदी (दै. संध्या)

तीर्थक्षेत्र आळंदीतील श्री संत सोपानदेव महाराज पूल (वैरागेश्वर मंदिर) ते श्री संत ज्ञानेश्वर महाराज पूल (भागेश्वरी धर्मशाळा) या इंद्रायणी नदीकाठच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण पूर्ण झाले आहे. जिल्हा नगरोत्थान योजनेअंतर्गत आळंदी नगरपरिषदेच्या माध्यमातून हे काम करण्यात आले असून, लवकरच हा रस्ता वाहतुकीसाठी खुला होणार आहे. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे म्हणाले, आळंदीतील नागरिक आणि भाविकांची गैरसोय दूर करून शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी नगरपरिषद प्रयत्नशील आहे. या रस्त्यामुळे वाहतूक अधिक सुलभ होईल. गटनेते सचिन गिलबिले म्हणाले, हा मार्ग नागरिक आणि वारकऱ्यांसाठी महत्त्वाचा आहे. रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने खड्डे, चिखल आणि वाहतुकीच्या समस्यांपासून नागरिकांना दिलासा मिळणार आहे. रस्त्याचे काँक्रिटीकरण झाल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांचीही सोय होणार असून, स्थानिक नागरिक आणि आळंदीत येणाऱ्या भाविकांमधून समाधान व्यक्त होत आहे.



■ सोपानदेव महाराज पूल ते ज्ञानेश्वर महाराज पूल मार्गाचे काम पूर्ण

कॉटनकिंग कंपनीतील कंत्राटी कामगारांवर अन्याय

अचानक बदली व कामावरून कमी करण्याच्या निर्णयाविरोधात जनशक्ती कंत्राटी कामगार संघ आक्रमक!

■ बारामती (दै. संध्या)

टेक्सटाइल पार्क,बारामती येथील कॉटन किंग कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांच्या अचानक बदलीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.ठेकेदाराने कामगारांना केवळ एक दिवस अगोदर बदलीची नोटीस देऊन त्यांची बदली करण्याचा निर्णय घेतल्याने कामगारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.या निर्णयामुळे अनेक कामगारांच्या रोजगाराचा आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे,संबंधित कामगार गेल्या ५, ७, १०, १२ ते १७ वर्षांपासून कॉटन किंग कंपनीमध्ये प्रामाणिकपणे काम करीत आहेत.एवढी वर्षे कंपनीसाठी सेवा दिल्यानंतरही त्यांना विश्वासात न घेता अचानक बदली करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने कामगारांवर अन्याय होत असल्याचा आरोप जनशक्ती कंत्राटी कामगार संघाच्या वतीने करण्यात आला आहे. या कामगारांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याचे सांगण्यात येत आहे.त्यामुळे या संपूर्ण प्रकरणामागे जातीयवादी मानसिकता आहे का,असा गंभीर सवाल उपस्थित होत असून, कामगारांवर जातीय भेदभावातून अन्याय होत असल्याचा संशय संघटनेने व्यक्त केला आहे.या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणण्याची मागणीही करण्यात येत आहे. एक दिवसाची नोटीस देऊन अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या कामगारांची बदली करणे अन्यायकारक असून,कामगारांना विश्वासात घेऊनच कोणताही निर्णय घेण्यात यावा. कामगारांना कामावरून कमी करण्याचा किंवा त्यांच्या रोजगारावर गदा आणण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही,अशी ठाम भूमिका जनशक्ती कंत्राटी कामगार संघाने घेतली आहे. या संपूर्ण प्रकरणात टेक्सटाइल पार्कच्या अध्यक्ष सुनेत्रा वहिनी पवार तसेच वरिष्ठ व्यवस्थापनाने तातडीने लक्ष घालून कामगारांना न्याय द्यावा,अशी मागणी करण्यात येत आहे. कामगारांची बदली तातडीने थांबवावी, अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या कामगारांना पूर्ववत कामावर कायम ठेवावे आणि जातीय भेदभावाच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करावी, अन्यथा जनशक्ती कंत्राटी कामगार संघाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गौरव अहिवळे यांनी दिला आहे.



राजगुरुनगर येथे छटपूजा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा

भाविकांकडून मावळत्या आणि उगवत्या सूर्याला अर्घ्य अर्पण



■ राजगुरुनगर (दै. संध्या)

उत्तर भारतीय नागरिकांचा महत्वाचा मानला जाणारा छटपूजा उत्सव राजगुरुनगर येथे मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या उत्सवानिमित्त भाविकांनी भीमानदी जलाशयांच्या काठावर एकत्र येत मावळत्या तसेच उगवत्या सूर्याला अर्घ्य अर्पण करून कुटुंबाच्या सुख-समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली.यावेळी मोठ्या संख्येने उत्तर भारतीय भाविक उपस्थित होते.

सूर्यदेवाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा आणि श्रद्धा, भक्ती व निसर्गपूजेचा अनोखा संगम असलेला छटपूजा उत्सव उत्तर भारतीय नागरिकांकडून मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा केला जातो. छटपूजा हा प्रामुख्याने बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश या ठिकाणी साजरा होणारा पारंपरिक धार्मिक उत्सव आहे. अलीकडच्या काळात महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, पिंपरी-चिंचवड आणि औद्योगिक परिसरात वास्तव्यास असलेल्या उत्तर भारतीय नागरिकांमध्येही या उत्सवाचे महत्त्व वाढले आहे. चार दिवस चालणाऱ्या या उत्सवाची सुरुवात नहाय-खाय या विधीने होते. दुसऱ्या दिवशी खरना करण्यात येतो. तिसऱ्या दिवशी सायंकाळी मावळत्या सूर्याला अर्घ्य दिले जाते, तर चौथ्या दिवशी पहाटे उगवत्या सूर्याला अर्घ्य अर्पण करून व्रताची सांगता केली जाते.


छटपूजा हा केवळ उत्सव नसून निसर्ग, जल आणि सूर्य यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा उत्सव आहे. सामाजिक एकोपा, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा लोकउत्सव भारतीय संस्कृतीतील विविधतेतून एकतेचे दर्शन घडवतो.

- आयोजक, शत्रुघ्न शर्मा,मदन शर्मा

ऊसतोड सुरू असताना बिबट्याचा आठ दिवसांचा बछडा आढळला

■ जुन्नर (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील राजुरी येथे बिबट्याचा वावर वाढत असतानाच घंगाळे मळ्यात ऊसतोड सुरू असताना बिबट्याचा अवघ्या आठ दिवसांचा बछडा आढळून आला. त्यामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, राजुरी येथील घंगाळे मळ्यात धोंडीभाऊ कारभारी घंगाळे यांच्या शेतात ऊसतोड सुरू होती. यावेळी ऊसाच्या शेतात बिबट्याचा लहान बछडा आढळून आला. घटनेची माहिती मिळताच वन अधिकारी विष्णू उचळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. बछडा अवघ्या आठ दिवसांचा असल्याने त्याची मादी बिबट्या परिसरातच असण्याची शक्यता वन विभागाने व्यक्त केली. त्यामुळे बछड्याला सुरक्षितपणे पुन्हा ऊसाच्या शेतात सोडण्यात आले. गेल्या तीन दिवसांपासून या परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ऊसतोडीचा हंगाम सुरू असल्याने शेतात काम करणारे शेतकरी, ऊसतोड मजूर आणि पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वन विभागाने या परिसरात पिंजऱ्यांची संख्या वाढवून आवश्यक त्या ठिकाणी तातडीने पिंजरा लावावा, अशी मागणी शरदचंद्र पतसंस्थेचे अध्यक्ष एम. डी. घंगाळे यांनी केली आहे. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वन विभागाने गस्त वाढवावी, अशीही मागणी होत आहे.



उद्धट येथे ओढ्यामध्ये नवजात अर्भक बेवारस अवस्थेत

अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल

■ वालचंदनगर (दै. संध्या)

इंदापूर तालुक्यातील उद्धट गावच्या हद्दीत ओढ्यामध्ये अंदाजे एक ते दोन दिवसांचे नवजात पुरुष जातीचे अर्भक निर्वस्त्र व बेवारस अवस्थेत आढळून आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखत अर्भकाला तातडीने मदत केली. त्यानंतर वालचंदनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अर्भकाला शासकीय महिला रुग्णालय, बारामती येथे दाखल केले. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची दोन तपास पथके रवाना करण्यात आली आहेत.

वालचंदनगर पोलीस ठाण्याकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रेस नोटनुसार, शुक्रवार (दि. १३ नोव्हेंबर) रोजी रात्री साडेआठच्या सुमारास उद्धट गावच्या हद्दीत विशाल गायकवाड यांच्या प्लॉटिंगसमोरील ओढ्यामध्ये नवजात पुरुष जातीचे अर्भक निर्वस्त्र व बेवारस अवस्थेत पडलेले होते. यावेळी सुभाष इंगोले (वय ४२, रा. उद्धट, ता. इंदापूर) यांच्या निदर्शनास ही बाब आली. अर्भकाच्या रडण्याचा आवाज ऐकून त्यांनी मोबाईलच्या टॉर्चच्या प्रकाशात पाहणी केली असता ओढ्यामधील गवतामध्ये नवजात अर्भक पडलेले असल्याचे दिसून आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सुभाष इंगोले यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ अर्भकाला उचलले. स्वतःच्या कपड्यांमध्ये गुंडाळून त्यांनी त्याला बारामती येथे नेले व त्याच्यावर प्राथमिक उपचार करून घेतले. त्यानंतर वालचंदनगर पोलीस स्टेशनशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.



घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वालचंदनगर पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांनी तातडीने दखल घेतली. महिला पोलीस अंमलदारांच्या मदतीने नवजात अर्भकाला पुढील उपचारासाठी शासकीय महिला रुग्णालय, बारामती येथे दाखल करण्यात आले. सध्या अर्भकावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



महापालिका म्हणते 'खासदारांच्या ब्रँडिंगसाठी ५० लाख उधळा : रविराज काळे

पुणे : दैनिक संध्या

राज्यात भीषण दुष्काळी परिस्थिती असून अवघा महाराष्ट्र होरपळत असताना, पुणे महानगरपालिकेने मात्र जनतेच्या कष्टाच्या पैशांची उधळपट्टी सुरूच ठेवल्याचे समोर आले आहे. पुणे महापालिकेच्या स्थायी समितीच्या ठरावानुसार (ठराव क्र. १५४८, दि. ०५/११/२०२६), १५ नोव्हेंबर २०२६ रोजी होणाऱ्या 'Give2Save Nest Foundation' आणि 'संस्कृती फाऊंडेशन'च्या 'पुणे युनिटी रन-२०२६' (मॅरेथॉन) या कार्यक्रमासाठी तब्बल ५० लाख रुपये अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या बेजबाबदार कारभारावर आम आदमी पार्टी युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रविराज काळे यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. या संदर्भात भूमिका मांडताना रविराज काळे म्हणाले की, "एकिकडे देशाचे पंतप्रधान राज्यातील आणि देशातील जनतेला आर्थिक परिस्थिती लक्षात घेता खर्चाचे प्रमाण कमी करण्याचे आणि काटकसर करण्याचे आवाहन करत आहेत. दुसरीकडे मात्र, पुणे महानगरपालिका पुण्याच्या खासदारांवर एवढी मेहेरबान का झाली आहे? खासदारांचे ब्रँडिंग करण्यासाठी सर्वसामान्य पुणेकरांच्या कररुपी पैशांची अशी उधळपट्टी करण्याचा अधिकार महापालिका आयुक्तांना कोणी दिला?" पुढे ते म्हणाले की, "हा सगळा प्रकार आणि निधीची उधळपट्टी लक्षात आल्यामुळेच बहुदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनीही या कार्यक्रमाकडे पाठ फिरवलेली दिसते. अवघ्या ५ ते १० लाखांमध्ये सहज होऊ शकणाऱ्या मॅरेथॉनसाठी ५० लाख रुपये देऊन नेत्यांची चमकोगिरी करणे ही कोणती नीतिमत्ता आहे?" राज्यात दुष्काळी परिस्थितीमुळे नगरसेवकांचे मानधन आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनात काटकसर केली जात असताना, दुसरीकडे एका इव्हेंटसाठी ५० लाखांची खिरापत वाटली जात असल्याचा आरोपही श्री. काळे यांनी केला आहे.

पुणे-पिंपरीतील औद्योगिक कामगारांसाठी पीएमपीच्या तीन शिफ्टमध्ये विशेष बससेवा

पुणे : दैनिक संध्या

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील औद्योगिक क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या लाखो कामगार आणि कर्मचाऱ्यांचा प्रवास आता अधिक सुखकर होणार आहे. कंपन्यांच्या कामाच्या वेळा लक्षात घेऊन ऑफ-टाइममध्ये (गर्दी नसलेल्या वेळेत) तीन शिफ्टनुसार विशेष बस चालवण्याचे नियोजन पीएमपीकडून करण्यात येत आहे.



या नियोजनामुळे कामगारांना हक्काची आणि सुरक्षित सार्वजनिक वाहतूक उपलब्ध होणार असून, पीएमपीच्या उत्पन्नातही मोठी भर पडणार आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील औद्योगिक वसाहतींमध्ये कंपन्यांचे कामकाज प्रामुख्याने तीन शिफ्टमध्ये चालते. यामध्ये सकाळी ६, दुपारी ३ आणि रात्री १० या वेळा महत्त्वाच्या असतात. नेमक्या याच वेळांमध्ये शहरातील इतर मार्गांवर पीएमपी बसला फारशी गर्दी (पिकअवर) नसते. त्यामुळे अनेक बस आगारांमध्ये किंवा थांब्यांवर उभ्या असतात. हीच बाब लक्षात घेऊन, ज्या वेळी पीएमपीच्या गाड्यांना प्रवासी नसतात, त्याच वेळेत औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची ने-आण करण्यासाठी विशेष बस सोडण्याचा आराखडा तयार केला जात आहे.

पुणे-गुवाहाटी विमानाचे लँडिंग गिअर निकामी; इमर्जन्सी जाहीर करुन सुरक्षित लँडिंग

पुणे : दैनिक संध्या

पुण्याहून गुवाहाटीकडे निघालेल्या इंडिगोच्या विमानात उड्डाणानंतर काही वेळातच मोठा तांत्रिक बिघाड झाल्याने एकच खळबळ उडाली. विमानाचे लँडिंग गिअर उड्डाणानंतर आत न घेता आल्याने विमानाचे पुणे विमानतळावर तातडीने इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. या विमानात एकूण १९२ प्रवासी आणि क्रू मेंबर्स होते. विमानाचे तात्काळ लँडिंग केल्याने मोठा अनर्थ टळला असून, सर्व प्रवासी सुखरूप आहेत. रविवारी सकाळी इंडिगोचे ६ई ०६२३ हे विमान पुण्याहून गुवाहाटीच्या दिशेने निघाले होते. पण टेक ऑफ केल्यानंतर विमानाची चाके नेहमीप्रमाणे आत न जाता बाहेरच राहिली. हा तांत्रिक बिघाड लक्षात येताच वैमानिकाने तात्काळ एअर ट्रॅफिक कंट्रोलला याबाबत माहिती दिली. पुणे विमानतळ भारतीय हवाई दलाच्या तळावरून चालवले जात असल्याने, माहिती मिळताच हवाई दलाने विमानतळावर फुल इमर्जन्सी जाहीर केली. विमानतळ प्रशासन, एटीसी आणि आपत्कालीन यंत्रणांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले. अग्निशमन दलाच्या गाड्या, रुग्णवाहिका रनवेवर तैनात करण्यात आली. विमान खाली उतरवण्यापूर्वी जमिनीवरील तज्ज्ञांना लँडिंग गिअरची प्रत्यक्ष पाहणी करता यावी, यासाठी वैमानिकाने खबरदारीचा उपाय म्हणून धावपट्टीवरून विमान जमिनीच्या अगदी जवळून उडवून पाहिले. त्यानंतर सकाळी ९ वाजून ४ मिनिटांनी हे विमान पुणे विमानतळावर सुरक्षितपणे उतरवण्यात आले.

फूल बाजाराला तजेला; दुष्काळाच्या सावटातही सव्वासहा कोटींची उलाढाल

पुणे : दैनिक संध्या

दुष्काळाचे सावट असतानाही फूल बाजारात सुमारे नऊ लाख किलो फुलांची आवक झाली. धनत्रयोदशी ते भाऊबीज या कालावधीत फूल बाजारात सहा कोटी २९ लाख रुपयांची उलाढाल झाली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा उत्पन्नात ४३ लाख ९९ हजार रुपयांनी वाढ झाली. 'गणेशोत्सव, नवरात्रौत्सव, तसेच दिवाळीत फूल बाजारात मोठी उलाढाल होते. चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील फूल बाजारात फुले विक्रीस पाठविण्यास प्राधान्य देतात. यंदा पावसाने ओढ दिल्याने फुलांची लागवड, तसेच प्रतवारीवर परिणाम झाला. सुमारे ६० ते ७० टक्के फुलांची प्रतवारी चांगली नव्हती. त्यामुळे अपेक्षेएवढा भाव मिळाला नाही. पाण्याच्या कमरतेमुळे फुलांच्या लागवडीवर परिणाम झाला,' अशी माहिती पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फूल बाजार विभागाचे प्रमुख संतोष कुंभारकर यांनी दिली.



भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक विकासकामांची मंत्री छगन भुजबळ यांच्याकडून पाहणी

कामे गतीने पूर्ण करण्याच्या दिल्या सूचना



■ पुणे (दै. संध्या)

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचे द्विशताब्दी जन्मवर्षानिमित्ताने महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा वारसा पुढच्या पिढीला माहिती होण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे; याबाबीचा विचार करता भिडेवाडा येथील विकासकामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि गतीने पूर्ण करावीत, द्विशताब्दी जन्मवर्षाचे औचित्य साधून स्मारकाचे लोकार्पण होईल या पद्धतीने नियोजन करावे, अशा सूचना राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिल्या.

भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केलेल्या ऐतिहासिक भिडेवाडा येथे उभारण्यात येत असलेल्या राष्ट्रीय स्मारकाला तसेच महात्मा फुले वाडा येथे भेट देवून विकासकामांची पाहणी केली, तसेच स्मारकाच्या उभारणीची प्रगती, वास्तुरचना आणि संवर्धनाच्या कामांचा त्यांनी आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. यावेळी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर, अधीक्षक अभियंता बिपीन शिंदे, उपायुक्त अविनाश संकपाळ, स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक संघटनेचे प्रतिनिधी, नागरिक आदी उपस्थित होते. छगन भुजबळ म्हणाले, भिडेवाडा हे भारतीय समाजसुधारणेच्या आणि स्त्रीशिक्षणाच्या इतिहासातील महत्त्वाचे प्रेरणास्थान आहे. या स्मारकाचे काम ऐतिहासिक वारशाचे जतन करत दर्जेदार आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करावे. स्मारकाचा परिसरातील रहदारीचा विचारात घेता आगामी काळात या परिसरातच पर्यायी वाहनतळाची व्यवस्था करावी. यामुळे परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.

ते पुढे म्हणाले, महात्मा फुले यांचा वाडा माजी राष्ट्रपती शंकरदयाळ शर्मा यांच्या हस्ते देशाला अर्पण करण्यात आला होता. आता महात्मा फुले स्मारकासाठी आराखडा तयार करुन जागा आरक्षित करण्यात आली आहे. याकरीता आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्यावतीने भुसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. बधितांना चारपट मोबदला देण्याबाबतचा ठराव पारित केला आहे, सदर ठरावाच्या प्रति नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात. प्रशासनाने याकामी स्थानिक लोकप्रतिनिधी,नागरिकांना विश्वासात घ्यावे, असे सांगून याकामी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी स्मारकाच्या कामाची सद्यस्थिती, विविध टप्प्यांतील प्रगती तसेच पुढील नियोजनाची माहिती मंत्री छगन भुजबळ यांना दिली.

राज्यातील महाविद्यालयांना एआयएसएचई सर्वेक्षण बंधनकारक

■ पुणे (दै. संध्या)

उच्च शिक्षणाची सद्य:स्थिती, महाविद्यालयांची संख्या, विद्यार्थी प्रवेश आणि शैक्षणिक सुविधांची माहिती संकलित करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण (एआयएसएचई) कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची माहिती भरणे राज्यातील महाविद्यालये आणि उच्च शिक्षण संस्थांना बंधनकारक करण्यात आले आहे.

संबंधित माहिती येत्या १० डिसेंबरपर्यंत एआयएसएचईच्या संकेतस्थळावर भरावी, असे निर्देश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने दिले आहेत. केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाकडून देशातील उच्च शिक्षणाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी एआयएसएचईच्या माध्यमातून दरवर्षी माहिती संकलित केली जाते.

त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची आकडेवारी संबंधित महाविद्यालयांनी ऑनलाइन पद्धतीने भरायची आहे. पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांसह दादरा नगर हवेली येथील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांना हे निर्देश लागू आहेत. महाविद्यालयांनी एआयएसएचई पोर्टलवरील डीसीएफ (डेटा कॅप्चर फॉर्म) मध्ये सर्व माहिती पूर्णपणे भरल्यानंतर ऑनलाइन अर्ज सादर करून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे.

स्वीकृत सदस्य निवड प्रक्रिया थंडावली

पात्र उमेदवारांची घालमेल वाढली

■ पुणे (दै. संध्या)

शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे लांबणीवर पडलेली पुणे महापालिकेच्या प्रभाग समित्यांवरील स्वीकृत सदस्य निवडीची प्रक्रिया अद्याप रखडली आहे. दिवाळी सण संपत आला तरी निवडीबाबत ठोस हालचाल झालेली नसल्याने इच्छुक उमेदवारांची प्रतीक्षा कायम आहे. आता आगामी प्रभाग समितीच्या बैठकीत निवड प्रक्रिया पूर्ण होणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त सुरेखा भणगे यांनी दिली.

पुणे महापालिकेने प्रभाग समित्यांवर स्वयंसेवी आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींना संधी देण्यासाठी ऑगस्ट महिन्यात निवड प्रक्रिया सुरू केली होती. धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तीन प्रभाग समित्यांमधील तीन जागांसाठी ५२ इच्छुकांनी अर्ज खरेदी केले होते. त्यापैकी २५ जणांनी अर्ज सादर केले असून, २२ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत. महापालिका निवडणुकीत उमेदवारी न मिळालेल्या राजकीय कार्यकर्त्यांसह सामाजिक क्षेत्रातील संस्थांच्या प्रतिनिधींनीही या संधीसाठी अर्ज केले आहेत. महापालिका अधिनियमातील तरतुदींनुसार शहरातील १५ प्रभाग समित्यांवर एकूण ४५ प्रतिनिधींची नियुक्ती



केली जाणार आहे.

उच्च न्यायालयाच्या २०१९ मधील निर्देशांनंतर या प्रक्रियेत सामाजिक आणि स्वयंसेवी क्षेत्रातील प्रत्यक्ष योगदानाला महत्त्व देण्याची अपेक्षा आहे. धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाकडून अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांची यादी संबंधित प्रभाग समितीसमोर मतदानासाठी ठेवण्याचे नियोजन होते. मात्र, शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने निवड प्रक्रिया थांबली. आचारसंहिता संपल्यानंतरही निवडीला मुहूर्त मिळालेला नाही. आता आगामी प्रभाग समितीच्या बैठकीत अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया पार पडणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांचे लक्ष या बैठकीकडे लागले आहे.

सिंहगडच्या २५ शैक्षणिक संस्थांवर सरकारची कारवाई

मारुती नवले यांच्यासह विश्वस्तांना पुणे सोडण्यास मनाई

■ पुणे (दै. संध्या)

विश्वस्त मारुती नवले यांच्यासह सर्व विश्वस्तांना पुणे सोडण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच, दर शुक्रवारी डेक्कन पोलिस ठाण्यात हजेरी लावणेही बंधनकारक केले आहे. सिंहगडच्या तांत्रिक संस्थांचा ताबा आता तंत्रशिक्षण पुणे विभागाचे सहसंचालक डॉ. सुरेश पाटील यांच्याकडे देण्यात आला आहे. संस्थेची बँक खाती आणि गुंतवणुका गोठवण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. आता येत्या १९ नोव्हेंबरला या प्रकरणाची पुढील सुनावणी पार पडणार आहे.

सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अखत्यारीतील २५ शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनावर राज्य सरकारने मोठी कारवाई केली आहे. या संस्थांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अनेक महिन्यांपासून नियमितपणे अदा न करणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, संस्थांचे शैक्षणिक कामकाज व्यवस्थित सुरू नसणे आणि न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी न करणे, या गंभीर बाबींची दखल घेत तंत्र शिक्षण विभागाने डॉ. पाटील यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली असून, तब्बल २५ संस्थांचा कारभार त्यांच्या हाती राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणात केवळ कर्मचाऱ्यांचे



वेतन हाच मुद्दा नसून, संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. संबंधित संस्थांमध्ये शैक्षणिक कामकाज व्यवस्थित पार पाडले जात नसल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. तसेच, सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी आणि तिच्या अखत्यारीतील संस्थांमधील वाद, निदर्शने आणि इतर घडामोडींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनीही शैक्षणिक नुकसान होत असल्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्यामुळे या संस्थांमधील शैक्षणिक वातावरण आणि कामकाजाच्या पद्धतीबाबत शासनाने गंभीर भूमिका घेतली आहे. या निर्णयामुळे संबंधित २५ संस्थांच्या व्यवस्थापनाची सूत्रे प्रशासकांकडे जाणार असून, संस्थांमधील शैक्षणिक कामकाज सुरळीत करणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळणे आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी लावणे, ही प्रशासकीय यंत्रणेसमोरील प्रमुख आव्हाने असणार आहेत.

'जेन झेड'ने कोंकणी संवर्धनाचे कार्य करावे : मुख्यमंत्री सावंत

पुण्यात ३४व्या अखिल भारतीय कोंकणी अधिवेशनाचे दिमाखात उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

कोंकणी भाषा आणि साहित्याचे वैभव पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आजच्या तरुण पिढीने स्वीकारली पाहिजे. विशेषत: 'जेन झेड' आणि नव्या पिढीतील युवकांनी कोंकणी साहित्याचे नियमित वाचन करण्याबरोबरच स्वतः लेखन करण्यासाठीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

पुणे येथे आयोजित ३४व्या अखिल भारतीय कोंकणी अधिवेशनाचे उद्घाटन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते व्यासपीठावर करण्यात आले. साहित्यिक अरुणा ढेरे, परिषदेचे अध्यक्ष नंदगोपाळ शणै, कार्याध्यक्ष चेतन आचार्य, स्वागताध्यक्ष अश्विनी जांभेकर कुलकर्णी व इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी कोंकणी भाषेचा देशभरात वाढत असलेला प्रसार, साहित्यिकांचे योगदान, भाषेच्या संवर्धनाची गरज आणि नव्या पिढीची भूमिका यावर आपले विचार मांडले. 'कोंकणी साहित्यामुळे आर्थिक उत्पन्न मिळेलच असे नाही; मात्र साहित्याच्या सहवासातून मनःशांती आणि मानसिक समाधान मिळते, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले की, साहित्य हे केवळ व्यावसायिक लाभ मिळविण्याचे माध्यम नसून ते माणसाचे विचारविश्व समृद्ध करणारे आणि सांस्कृतिक ओळख जपणारे महत्त्वाचे साधन आहे. तरुणांनी साहित्याकडे केवळ छंद म्हणून न पाहता आपल्या भाषेच्या अस्तित्वाशी, सांस्कृतिक वारशाशी जोडलेले महत्त्वाचे माध्यम म्हणून पाहावे.'

आजच्या डिजिटल आणि आधुनिक युगात तरुण पिढीचा साहित्याशी असलेला संपर्क वाढविणे आवश्यक आहे. कोंकणी भाषेतील पुस्तके वाचणे, कथा, कविता, लेख आणि अन्य साहित्यप्रकारांमध्ये लेखन करणे यासाठी युवकांना प्रोत्साहित केले पाहिज, असे मतही मुख्यमंत्री सावंत यांनी व्यक्त केले.

दरम्यान, महाराष्ट्रात कोंकणी भाषेच्या संवर्धनासाठी स्वतंत्र कोकणी अकादमी स्थापन करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांच्याकडे करणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा डॉ. प्रमोद सावंत यांनी यावेळी केली. 'महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कोंकणी भाषिक नागरिक वास्तव्यास असून तेथील कोंकणी भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक परंपरेच्या जतनासाठी संस्थात्मक व्यासपीठाची आवश्यकता आहे. यासाठी महाराष्ट्र सरकारने कोंकणी अकादमी स्थापन करण्याच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलावे, अशी विनंती करणारे पत्र मी फडणवीस यांना लिहिणार आहे.'

मुख्यमंत्री म्हणाले की, 'कोंकणी अकादमीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील कोंकणी साहित्यिक, लेखक, कवी आणि भाषाप्रेमींना प्रोत्साहन मिळण्यास मदत होऊ शकते. तसेच कोंकणी भाषेच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना अधिक व्यापक व्यासपीठ उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.'

गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्यात कोंकणी साहित्यिक आणि साहित्यविश्वाशी संबंधित व्यक्तींनी दिलेल्या योगदानाचाही मुख्यमंत्री सावंत यांनी आवर्जुन उल्लेख केला. गोव्याच्या मुक्तिसंग्रामात साहित्यिकांनी बजावलेली भूमिका महत्त्वपूर्ण असून, त्यांच्या योगदानाचे स्मरण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

गोव्याच्या मुक्तिसंग्रामाला पुणे आणि मुंबई येथील नागरिकांनी दिलेले योगदानही कधीही विसरता येणार नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले. गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्याला महाराष्ट्रातील विविध भागांतून मिळालेला पाठिंबा आणि सहकार्य हे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

गोवा मुक्तिसंग्रामात केवळ राजकीय आणि प्रत्यक्ष आंदोलन करणाऱ्या व्यक्तींचेच नव्हे तर साहित्यिक, विचारवंत आणि विविध माध्यमांतून जनजागृती करणाऱ्या व्यक्तींचे योगदानही महत्त्वाचे होते. या ऐतिहासिक योगदानाचे स्मरण नव्या पिढीपर्यंत पोहोचले पाहिजे. कोंकणी भाषा ही केवळ गोव्यापुरती मर्यादित नसून देशाच्या विविध भागांत कोंकणी भाषिक समाजाने आपली ओळख जपली आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

थोडक्यात पण महत्वाचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'पत्रकार दर्पण' दिवाळी अंकाचे प्रकाशन

■ पत्रकारांच्या सन्माननिधी योजनेतील अडचणी सोडविण्यासाठी बैठकीची मागणी

मुंबई : दैनिक संध्या

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या 'पत्रकार दर्पण' दिवाळी अंकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी करण्यात आले. यावेळी पत्रकारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी आयोजित दिवाळी कार्यक्रमात संघाच्या कार्यकारिणीने त्यांची भेट घेतली. पत्रकारांच्या सन्माननिधी योजनेतील अडचणी दूर करण्यासाठी शासनस्तरावर लवकरात लवकर बैठक आयोजित करण्यात यावी, अशी विनंती अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. तसेच म्हाडाच्या आगामी गृहनिर्माण योजनेत मुंबई मराठी पत्रकार संघाच्या गरजू पत्रकार सदस्यांसाठी घरे आरक्षित ठेवण्यात यावीत, या मागणीचे निवेदनही मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवनाच्या नूतनीकरणाचा महत्त्वाचा मुद्दाही यावेळी मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्यात आला. पत्रकार संघाच्या वास्तूचे नूतनीकरण करण्यासाठी शासनाने आवश्यक सहकार्य करावे, अशी मागणी करण्यात आली. या प्रकाशन सोहळ्याला मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यवाह शैलेंद्र शिर्के, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर व राजेंद्र हुंजे, खजिनदार जगदीश भोवड, संयुक्त कार्यवाह राजेश माळकर, कार्यकारिणी सदस्य तथा 'पत्रकार दर्पण'चे कार्यकारी संपादक विनोद साळवी, गजानन सावंत, आत्माराम नाटेकर, किरीट गोरे, अंशुमन पोयरेकर, राजेश खाड्ये आणि अंतर्गत हिशेब तपासनीस संजय परब उपस्थित होते.

समान नागरी कायद्याबाबत हरकती व मते नोंदविण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन

■ मुंबई शहर जिल्ह्यासाठी २१ नोव्हेंबर रोजी कोकण भवन येथे जनसुनावणी

मुंबई : दैनिक संध्या

समान नागरी कायद्याबाबत (यूसीसी) विविध हितसंबंधी गट, संस्था आणि नागरिकांच्या सूचना, हरकती व मते जाणून घेण्यासाठी मुंबई शहर जिल्ह्याची जनसुनावणी २१ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या कोकण भवन, नवी मुंबई येथील कार्यालयात होणार आहे. संबंधितांनी या जनसुनावणीस उपस्थित राहावे, असे आवाहन मुंबई शहर तहसीलदार डॉ. मानसी मार्लेवार यांनी केले आहे. समान नागरी कायद्याबाबत सूचना, हरकती आणि मते जाणून घेण्यासाठी गठित समितीमार्फत या जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. विविध हितसंबंधी गट, संस्था आणि नागरिकांना जनसुनावणीत आपली भूमिका मांडता येणार आहे.

ग्रामपंचायत कोडीत बु ता.पुरंदर जि.पुणे

B-1 टेडर नोटीस क्र.१ सन २०२६/२७

ग्रामपंचायत कोडीत बु, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत कोडीत बु ता. पुरंदर जि.पुणे यांच्याकडुन दिनांक १६/११/२०२६ ते दिनांक २३/११/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी / ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	निवीदा विक्री करण्याचा कालावधी	निवीदा फी	इसारा रक्कम
१	म्हस्कोबा वाडी अंगणवाडी येथे पेव्हिंग ब्लॉक बसवणे.	३५९०९९/-	दि. १६/११/२०२६ ते दि. २३/११/२०२६	५९०/-	३५९१/-
२	म्हस्कोबा वाडी जि.प. शाळा येथे पेव्हिंग ब्लॉक बसवणे.	३३६५०४/-		५९०/-	३३६५/-
३	कोडीत बु. येथे घनकचरा व्यवस्थापन करणे.	२९९९८४/-		२३६/-	३०००/-

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोऱ्या निविदा फी व इसारा रक्कम ग्रामपंचायत कोडीत बु PDCC बँक शाखा सासवड खाते क्र. ००६००२५०००००३२ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश / डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. २) निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत कोडीत बु यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत कोडीत बु. ता पुरंदर जि पुणे

पुणे महानगरपालिका

निविदा प्रक्रिया कक्ष

मुदतवाढ निविदा जाहिरात

कामकाजाचे ठिकाण :- निविदा प्रक्रिया कक्ष, उपआयुक्त परिमंडळ क्र.५
शिवाजी ढेरे उदयोग भवन, दुसरा मजला टिळकरोड, पुणे महानगरपालिका.

विक्री कालावधी दिनांक : १६/११/२०२६ ते २३/११/२०२६ दु : २:०० पर्यंत
स्विकृती कालावधी दिनांक : १६/११/२०२६ ते २३/११/२०२६ दु : २:०० पर्यंत
निविदा उघडणे कालावधी दिनांक : २५/११/२०२६ दु : १२:०० वाजता

अ. क्र.	खात्याचे नाव	मुदतवाढ टेंडर क्रमांक
१)	कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय	PMC/DMC-5/ KASABA/2026/253, PMC/DMC-5/ KASABA/2026/269, PMC/DMC-5/ KASABA/2026/273, PMC/DMC-5/ KASABA/2026/275.

अ) वरील टेंडर्सची विक्री व स्विकृती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन फक्त ऑनलाईन चालू आहे.
ब) बाकी सर्व मजकुर पुर्वी प्रसिध्द केल्याप्रमाणे कायम राहील.
क) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि.) / ३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस/आर.टी.जी.एस/एन.ई.एफ.टी सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहेत.

सही/-
माधव के. जगताप
उप आयुक्त परिमंडळ विभाग क्र. ५
पुणे महानगरपालिका, पुणे

जाहिरात क : ५५-DC-५-२०२६
दिनांक : १३/११/२०२६

बालिकांच्या आत्मविश्वासाला नवे बळ

■ अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत 'एक दिवसाची जिल्हाधिकारी उपक्रम'

■ बालदिनाचे औचित्य साधून बालिकांना नेतृत्वाची संधी; आचल वसावे बनली एका दिवसाची जिल्हाधिकारी



■ नंदुरबार (दै. संध्या)

"मुलींच्या हातात संधी दिली, तर त्या नेतृत्वाची जबाबदारीही समर्थपणे पेलू शकतात. आचलसारख्या विद्यार्थिनींना मिळणाऱ्या अशा संधी त्यांच्या आत्मविश्वासाला नवी उंची देतात. प्रत्येक मुलीला मोठी स्वप्ने पाहता यावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी आवश्यक बळ मिळावे, हीच आपली अपेक्षा आहे," असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी केले.

बालदिनाचे औचित्य साधून नंदुरबार जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या 'एक दिवसाची जिल्हाधिकारी' या अभिनव उपक्रमाच्या निमित्ताने त्या बोलत होत्या. मुलींना केवळ शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे पुरेसे नसून त्यांच्यात नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास निर्माण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. महिला आणि बालिका सक्षमीकरणाच्या याच व्यापक दृष्टिकोनातून अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालय संकुलातील 'रुखमाबाई बालिकाश्रम' बालगृहातील मुलींशी मंत्री अदिती तटकरे यांनी मनमोकळा संवाद साधला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'एक दिवसाची जिल्हाधिकारी' या उपक्रमांतर्गत सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय, सौरपाडा येथील इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कु. आचल धीरज वसावे हिला एका दिवसासाठी जिल्हाधिकारी म्हणून कामकाज समजून घेण्याची अनोखी संधी मिळाली. या उपक्रमातून आचलला जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशासकीय कामकाज, शासनाची निर्णयप्रक्रिया आणि प्रशासनाची कार्यपद्धती यांचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. प्रशासनातील विविध जबाबदाऱ्या समजून घेताना तिला लोकाभिमुख कारभाराची ओळखही झाली. एका विद्यार्थिनीला मिळालेली ही संधी इतर मुलींसाठीही मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी आत्मविश्वासाने पुढे येण्याची प्रेरणा देणारी ठरली.

महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून मुलींचे शिक्षण, सुरक्षितता, स्वावलंबन आणि सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्याच्या दिशेने मंत्री अदिती तटकरे यांचे प्रयत्न सुरू आहेत. मुलींना केवळ शासकीय योजनांच्या लाभार्थी म्हणून न पाहता त्यांना नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करून देणे, निर्णयप्रक्रियेची ओळख करून देणे आणि स्वतःची क्षमता सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, ही महिला सक्षमीकरणाची व्यापक संकल्पना या उपक्रमातून अधोरेखित झाली. मुलींमध्ये असलेली क्षमता ओळखून त्यांना योग्य वेळी प्रोत्साहन आणि संधी मिळणे आवश्यक आहे. अशा अनुभवांमुळे मुलींच्या मनातील प्रशासकीय सेवा, सामाजिक नेतृत्व आणि सार्वजनिक जीवनातील सहभागाबाबतची जिज्ञासा वाढण्यास मदत होते. त्यामुळे बालिकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अशा उपक्रमांना विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी महिला व बालविकास विभागाच्या आयुक्त माधवी सरदेशमुख, जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल तसेच संबंधित अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. एका दिवसासाठी जिल्हाधिकारी होण्याची संधी आचलसाठी अविस्मरणीय ठरली; मात्र तिच्या माध्यमातून जिल्ह्यातील असंख्य मुलींना मिळालेला संदेश अधिक महत्त्वाचा आहे. संधी मिळाली तर मुलीही नेतृत्व करू शकतात आणि आपल्या कर्तृत्वाने नवी ओळख निर्माण करू शकतात, हाच या उपक्रमाचा खरा संदेश ठरला.

शेतकऱ्यांनी ई-केवायसी व फार्मर आयडी तातडीने तयार करावा

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषीविषयक तसेच अन्य विभागांच्या योजनांचा लाभ थेट मिळावा, यासाठी ॲग्रीस्टॅक प्रणालीतील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे. या प्रणालीच्या माध्यमातून कृषी व अन्य विभागांच्या विविध योजनांची मदत शेतकऱ्यांपर्यंत सातत्याने पोहोचविण्यात येत आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करून फार्मर आयडी प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

शासनाच्या विविध योजनांमधून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य, अनुदान व अन्य लाभ देण्यात येतात. यापूर्वीही शासनाने विविध संकटांच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून दिली आहे. सध्या राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ई-केवायसी व फार्मर आयडीचे महत्त्व अधिक वाढले आहे. पात्र शेतकऱ्यांना मदतीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक नोंदणी व पडताळणी प्रक्रिया पूर्ण असणे गरजेचे आहे. ॲग्रीस्टॅक प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची माहिती एकत्रित व अद्ययावत करण्यात येत असून, विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरत आहे. शेतकऱ्यांनी ई-केवायसी तसेच फार्मर आयडीची प्रक्रिया पूर्ण केल्यास योजनांचा लाभ मिळण्यातील अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे. ई-केवायसी किंवा फार्मर आयडी तयार करताना शेतकऱ्यांना काही तांत्रिक अथवा अन्य अडचणी येत असल्यास राज्य शासनामार्फत त्या सोडविण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल.

कन्नमवार नगरात आकाश पवार यांची एवढी चलती कोणाच्या आशीर्वादाने?

■ दिवाळी पहाट कार्यक्रमाच्या कोट्यवधींच्या खर्चाची चर्चा

■ स्थानिक शिवसैनिकांचा बहिष्कार, ज्येष्ठ शिवसैनिकांकडून आमदारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

■ मुंबई (दै. संध्या)

विक्रोळी कन्नमवार नगर परिसरात शिवसैनिक आकाश पवार यांची वाढती राजकीय सक्रियता आणि स्थानिक आमदारांसोबत झळकणारे त्यांचे फोटो असलेले मोठमोठे कटआऊट सध्या चर्चेचा विषय ठरत आहेत. यंदा त्यांनी आयोजित केलेल्या 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाचीही परिसरात जोरदार चर्चा सुरू आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने संपूर्ण कन्नमवार नगर परिसरात आमदार आणि खासदारांचे भव्य कटआऊट लावण्यात आले होते. मात्र, या कार्यक्रमासाठी नेमका निधी कोठून आला आणि एवढ्या कमी कालावधीत इतका मोठा खर्च कसा करण्यात आला, असे प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत.

या कार्यक्रमाचे संयोजन 'श्रीमंत राजयोगी प्रतिष्ठान' या संस्थेकडे होते. विशेष म्हणजे, ही संस्था २०२६ मध्येच स्थापन झाल्याची माहिती समोर येत असल्याने अल्पावधीतच एवढ्या मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी आर्थिक पाठबळ कोणी दिले, याबाबत परिसरात चर्चा रंगली आहे. कार्यक्रमाच्या जाहिरातींसाठी कन्नमवार नगरातील व्यावसायिक आणि जाहिरातदारांना वेठीस धरल्याचा आरोपही केला जात आहे. विशेष म्हणजे, या कार्यक्रमाला स्थानिक शिवसैनिक आणि काही पदाधिकाऱ्यांनी बहिष्कार घातल्याची चर्चा आहे. त्यामुळे पक्षातील स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असल्याचे बोलले जात आहे.

एका बाजूला वर्षानुवर्षे पक्षासाठी काम करणारे स्थानिक शिवसैनिक आणि पदाधिकारी आहेत, तर दुसऱ्या बाजूला अल्पावधीत मोठे राजकीय पाठबळ आणि आर्थिक ताकद मिळवणारे आकाश पवार कोणाच्या आशीर्वादाने एवढे प्रभावशाली झाले, असा सवाल उपस्थित होत आहे.

"एका सामान्य शिवसैनिकावर आमदारांची एवढी मेहरबानी का? आकाश पवार यांना नेमके कोणाचे पाठबळ आहे? त्यांच्या कार्यक्रमासाठी एवढा मोठा खर्च करण्यामागे कोण आहे? या सर्व बाबींची चर्चा कन्नमवार नगरात सुरू आहे," अशी प्रतिक्रिया एका ज्येष्ठ शिवसैनिकाने आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली. दरम्यान, या कार्यक्रमाचा खर्च, त्यासाठी उभारण्यात आलेला निधी, जाहिरातींचे स्वरूप आणि प्रतिष्ठानची भूमिका याबाबत पारदर्शकता असावी, अशी अपेक्षा स्थानिकांकडून व्यक्त होत आहे. या संपूर्ण प्रकरणावर संबंधित आमदार, आकाश पवार आणि प्रतिष्ठानची अधिकृत भूमिका समोर येणे आवश्यक आहे.याबाबत स्थानिक आमदार यांच्याशी मोबाईल वरून संपर्क साधला असता ते उपलब्ध होऊ शकेल नाहीत.

इंडेल मनीच्या नफ्यात २२२ टक्क्यांची भरारी

■ दुसऱ्या तिमाहीत ८० कोटींचा नफा

■ व्यवस्थापनाखालील मालमत्तेत ८३ टक्क्यांची वाढ होऊन ५,०१५ कोटींवर

■ निव्वळ उत्पन्न दुपटीहून अधिक, निव्वळ व्याज उत्पन्नात ११८ टक्क्यांची वाढ

■ पुणे (दै. संध्या)

इंडेल समूहाचा भाग असलेल्या आणि सुवर्णकर्ज क्षेत्रात कार्यरत असलेल्या इंडेल मनी लिमिटेड या अग्रगण्य बिगर बँकिंग वित्तीय कंपनीने (एनबीएफसी) सप्टेंबर २०२६ मध्ये संपलेल्या आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या दुसऱ्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. कंपनीने या तिमाहीत ७९.९८ कोटी रुपयांचा करानंतरचा नफा (पीएटी) नोंदवला असून, गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत त्यात २२२ टक्क्यांची प्रभावी वाढ झाली आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने ५ नोव्हेंबर २०२६ रोजी या निकालांना मंजुरी दिली.

सप्टेंबर २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत (एच१एफवाय२७) कंपनीने १०७.६२ कोटी रुपयांचा करानंतरचा नफा नोंदवला. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ही वाढ १२१ टक्के आहे. कंपनीच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्तेत (एयूएम) वार्षिक तुलनेत ८३ टक्क्यांची वाढ होऊन ती ५,०१५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. कंपनीचे निव्वळ उत्पन्न १११ टक्क्यांनी वाढून १५९.८१ कोटी रुपये झाले, तर निव्वळ व्याज उत्पन्नात (एनआयआय) ११८ टक्क्यांची वाढ होऊन ते १४५ कोटी रुपयांवर पोहोचले. कंपनीच्या मुख्य व्यवसायाची नफाक्षमता दर्शवणाऱ्या तरतुदीपूर्व परिचालन नफ्यात (पीपीओपी) १८२ टक्क्यांची वाढ होऊन तो ९८.९५ कोटी रुपयांवर पोहोचला. कंपनीची एकूण अनुत्पादित मालमत्ता (जीएनपीए) १.४१ टक्के इतकी नोंदवण्यात आली असून, मागील तिमाहीच्या तुलनेत त्यात घट झाली आहे. दुसऱ्या तिमाहीत कंपनीचा मालमत्तेवरील परतावा (आरओए) ६.८५ टक्के, तर पहिल्या सहामाहीत ४.८५ टक्के राहिला. तिमाहीअखेर कंपनीचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (सीआरएआर) २२.२० टक्के नोंदवण्यात आले. हे प्रमाण नियामक संस्थेने निर्धारित केलेल्या १५ टक्क्यांच्या किमान मर्यादेपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक आहे. कंपनीने दुसऱ्या तिमाहीत १,४९६ कोटी रुपयांचा निधी उभारला असून, पहिल्या सहामाहीत एकूण निधी उभारणी २,२२० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. यातील बहुतांश निधी असुरक्षित नसलेल्या कर्जरोख्यांद्वारे (एनसीडी) आणि मुदत कर्जाद्वारे उभारण्यात आला. दुसऱ्या तिमाहीत कंपनीने २,४८० कोटी रुपयांच्या कर्जाचे वितरण केले, तर पहिल्या सहामाहीतील एकूण कर्जवितरण सुमारे ४,५०० कोटी रुपये झाले. या तिमाहीत कंपनीने २७ नवीन शाखा सुरू केल्या असून, त्यामुळे एकूण शाखांची संख्या ४२७ झाली आहे.



क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन

■ मुंबई (दै. संध्या)

आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी जल-जंगल-जमीन यांच्या रक्षणासाठी आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात अतुलनीय योगदान देणाऱ्या क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांना जयंतीनिमित्त मंत्रालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे यांनी क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी सामान्य प्रशासन विभागाचे कक्ष अधिकारी दत्तात्रय शिंदे, सहायक कक्ष अधिकारी सुनील जाधव तसेच मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. त्यांनीही क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस गुलाबपुष्प वाहून अभिवादन केले.

कष्टकरी सफाई कामगार आणि रिक्षाचालकांची दिवाळी गोड!

■ उपमहापौर परशुराम वाडेकर व सुनीता वाडेकर यांच्या पुढाकारातून १५ वर्षांपासून दिवाळी स्नेहभेट उपक्रम

■ पुणे (दै. संध्या)

समाजाच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र मेहनत घेणारे सफाई कामगार, आरोग्य कर्मचारी, रिक्षाचालक आणि विद्युत कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करण्याचा उपक्रम बोपोडी येथे राबविण्यात आला. विद्यमान उपमहापौर परशुराम वाडेकर, पुण्याच्या माजी उपमहापौर सुनीता परशुराम वाडेकर आणि मित्र परिवाराच्या वतीने दिवाळी स्नेहभेट समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. बोपोडी येथील सम्यक विहार व विकास केंद्र येथे हा उपक्रम उत्साहात पार पडला.



गेल्या १५ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. यंदाही औंध क्षेत्रीय कार्यालय, बाबुराव शेवाळे हॉस्पिटल, चिखलवाडी आरोग्य केंद्र, बोपोडी आरोग्य केंद्र आणि संजय गांधी रुग्णालय आरोग्य कोठी येथील सफाई कर्मचारी, मुकादम, तसेच प्रभागातील रिक्षाचालक आणि विद्युत कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त मिठाई व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रकुलगुरू डॉ. पराग काळकर, माजी सनदी अधिकारी शरद जाधव आणि पुणे शहर आरपीआयचे अध्यक्ष संजय सोनवणे यांच्या हस्ते भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी उद्धव राणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी आरोग्य मुकादम सिद्धार्थ बागुल, सुरेश गायकवाड, शेलार, अनिल शिंदे, आरोग्य निरीक्षक योगेश जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने आरोग्य कर्मचारी, रिक्षाचालक आणि विद्युत कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) शिवाजीनगर विधानसभा अध्यक्ष अविनाश कदम, कार्याध्यक्ष भीमा गायकवाड, उपाध्यक्ष निलेश वाघमारे, सचिव राजेंद्र शिंदे, सचिन चव्हाण, माजी पुणे युवक जिल्हाध्यक्ष उमेश कांबळे, पुणे शहर उपाध्यक्ष ज्वेल अँथोनी, भीमराव वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी निलेश वाघमारे, राजेंद्र शिंदे, अनेश रोकडे, बाळासाहेब मोरे, सादिकभाई शेख, बापू रणदिवे, कैलास कांबळे, विलास जाधव, रुपेश पिल्ले, बोपोडी ब्लॉक अध्यक्ष सुरेंद्र आठवले, नंदाताई निकाळजे, कलावती भंडारे, शिवाअण्णा पिल्ले आणि विनीत चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. ज्ञानेश जावीर यांनी केले, तर छायाचित्रण ज्येष्ठ छायाचित्रकार विजय सोनीगरा यांनी केले.

थोडक्यात पण महत्वाचे



हजारो मतदारांची नावे गायब; थेट संभाजीनगर, ठाणे, अंबरनाथच्या मतदार यादीत समावेश?

भोसरी: दैनिक संध्या

२०२४ मध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान भोसरी विधानसभा मतदारसंघातील हजारो मतदारांची नावे अचानक मतदार यादीतून गायब झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, भोसरीतील स्थानिक मतदारांची नावे त्यांच्या मूळ मतदारसंघातून वगळली जाऊन थेट छत्रपती संभाजीनगर, ठाणे आणि अंबरनाथ यांसारख्या दूरच्या शहरांतील मतदार यादीत समाविष्ट करण्यात आल्याचा गंभीर आरोप बाधित मतदारांनी केला आहे. या प्रकारामुळे अनेक नागरिकांना निवडणुकीत मतदानाच्या घटनात्मक अधिकारापासून वंचित राहावे लागल्याची भावना व्यक्त होत आहे. आपले नाव वर्षानुवर्षे भोसरीच्या मतदार यादीत असताना अचानक ते दुसऱ्या शहरातील यादीत कसे गेले? ही नावे कोणत्या प्रक्रियेद्वारे स्थलांतरित करण्यात आली? यामागे नेमकी चूक कोणाची? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. लोकशाही व्यवस्थेत मतदानाचा अधिकार हा प्रत्येक पात्र नागरिकाचा मूलभूत लोकशाही अधिकार आहे. मात्र, मतदारांची नावे अशा प्रकारे एका शहरातून दुसऱ्या शहरात गेल्याचा प्रकार घडत असेल, तर निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. एका बाजूला निवडणूक आयोगाकडून मतदार नोंदणी आणि मतदानाबाबत जनजागृती केली जाते, तर दुसऱ्या बाजूला हजारो मतदारांना आपले नाव शोधण्यासाठी आणि मतदानाचा हक्क बजावण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची निवडणूक आयोगाने सखोल चौकशी करून भोसरीतील मतदारांची नावे नेमकी कोणत्या कारणाने आणि कोणाच्या माध्यमातून इतर शहरांच्या मतदार यादीत समाविष्ट झाली, याचा खुलासा करावा. तसेच दोषींवर कारवाई करून बाधित मतदारांना न्याय द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

इनोव्हा कारमधून ३ लाखांची रोकड लंपास; केशवनगर येथील घटना

चिंचवड : दैनिक संध्या



सोसायटीसमोरील फॅब्रिकेशन गोडावूनमध्ये पार्क केलेल्या इनोव्हा कारमधील तीन लाख रुपयांची रोकड संमतीशिवाय घेऊन एक तरुण आपल्या मूळ गावी निघून गेला. ही घटना ५ नोव्हेंबर रात्री साडेनऊ ते ६ नोव्हेंबर सकाळी साडेसहाच्या दरम्यान चिंचवडगावातील केशवनगर येथे घडली. याप्रकरणी महेंद्र राजपूत (वय २०, रा. बलिराज धुरीखेडा, निहास्था, रायबरेली, उत्तर प्रदेश) याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. सचिन संपतराव काकडे (वय ४७, व्यवसाय शेती, रा. फ्लॅट क्रमांक १०४, एच विंग, गोयल गरिमा सोसायटी, केशवनगर, चिंचवडगाव) यांनी शुक्रवारी (दि. १३ नोव्हेंबर) रोजी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपीने गोडावूनमध्ये पार्क केलेल्या इनोव्हा कारमधील (एमएच १४ एलयू ०९५५) तीन लाख रुपयांची रोकड फिर्यादीच्या संमतीशिवाय घेतली आणि उत्तर प्रदेशातील मूळ गावी निघून गेला. तो परत येईल म्हणून फिर्यादीने काही दिवस वाट पाहिली. दरम्यान, दिवाळी सणासाठी फिर्यादी आपल्या मूळ गावी गेले असता त्यांनी आरोपीला फोन केला; मात्र आरोपीने फोन उचलणे बंद केल्याने चोरीची खात्री पटली.

लोकशाही वाचवण्यासाठी जनतेने बोलते होण्याची गरज : सोनाली शिंदे

पिंपरी: दैनिक संध्या

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान आणि आधुनिक भारताचे शिल्पकार भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. चिंचवडगाव येथील कै. आनंदीबाई डोके सांस्कृतिक सभागृहात शनिवारी (दि. १४ नोव्हेंबर) सकाळी हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या व्याख्यानमालेत 'नेहरू काळ – भारताचे सर्वांगीण विकास पर्व' या विषयावर निश्चय साक्षात साधना सर यांनी, तर 'निवडणुका, नेहरू आणि न्यू मीडिया' या विषयावर राजकीय-सामाजिक विषयांच्या अभ्यासक, लेखिका व पत्रकार सोनाली शिंदे यांनी मार्गदर्शन केले. जेन-झी आंदोलनाने लोकांच्या मनातील व्यक्त होण्याची भीती दूर करून त्यांना आपले मत मांडण्याची वाट मोकळी करून दिली आहे. लोकशाही वाचवायची असेल, तर प्रत्येक नागरिकाने बोलते होण्याची गरज आहे, असे मत सोनाली शिंदे यांनी व्यक्त केले. देशातील अंतिम सत्ता ही जनतेचीच राहण्यासाठी प्रत्येक सर्वसामान्य नागरिकाने प्रयत्न करणे, हीच पंडित जवाहरलाल नेहरू यांना खरी आदरांजली ठरेल, असेही त्या म्हणाल्या. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संविधान सभेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

निःस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या लेकरांना पुरस्कार समर्पित : माता अमृतानंदमयी

पिंपरी : दैनिक संध्या

"मराठी पत्रकार संघाने दिलेला हा पुरस्कार म्हणजे माझ्या लेकरांनी दिलेला पुरस्कार आहे. माझी लेकरं हाच माझा सर्वात मोठा पुरस्कार असून, जगाला निःस्वार्थ भावनेने सेवा देणाऱ्या या लेकरांना मी हा पुरस्कार समर्पित करते," अशा भावपूर्ण शब्दांत आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या आध्यात्मिक गुरू तथा विश्वमाता माता अमृतानंदमयी (अम्मा) यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मराठी पत्रकार संघाच्या वतीने निगडी येथे शनिवारी (दि. १४ नोव्हेंबर) आयोजित सोहळ्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते अम्मांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला आमदार महेश लांडगे, दैनिक सकाळच्या संपादक शीतल पवार, डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या भाग्यश्री पाटील, कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, व्हीजे डेव्हलपर्सच्या अस्मिता जावडेकर, मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी, प्रदेश उपाध्यक्ष विवेक इनामदार आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे या सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. अम्मा म्हणाल्या, महाराष्ट्र ही संत-महात्म्यांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी त्याग व देशभक्तीचा आदर्श घालून दिला आहे. महाराष्ट्रातील महापुरुषांचे योगदान अत्यंत प्रेरणादायी आहे. समाजात धर्मभावना आणि नैतिक मूल्ये टिकवून ठेवण्यात पत्रकारांची भूमिका महत्त्वाची आहे. पत्रकारांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, यासाठी मी प्रार्थना करते. अत्यंत विनम्र भावनेने हा पुरस्कार स्वीकारत असल्याचेही त्यांनी सांगितले. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, महिलांना स्वावलंबी बनविण्याबरोबरच विकसित राष्ट्र घडविण्याच्या कार्यात अम्मांचे योगदान मोठे आहे. मायेचा अथांग सागर असलेल्या माता अमृतानंदमयी यांचा हा सत्कार म्हणजे कृतज्ञता सोहळा आहे.

जनता शिक्षण संस्थेतील आर्थिक अनियमितता आणि मनमानी कारभारावर चौकशी अहवालात गंभीर निरीक्षणे; दोषींवर फौजदारी कारवाईची मागणी!

■ पिंपरी (दै. संध्या)



दापोडी येथील जनता शिक्षण संस्था या सार्वजनिक न्यासाच्या कारभाराबाबत दाखल करण्यात आलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे विभागामार्फत करण्यात आलेल्या निरीक्षक चौकशी अहवालात संस्थेच्या आर्थिक व्यवहारांबाबत, शाळांच्या बांधकामांबाबत आणि निविदा प्रक्रियेबाबत गंभीर निरीक्षणे नोंदविण्यात आली आहेत. याशिवाय संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश जगताप आणि सचिव सुभाष जावळे यांच्या कार्यपद्धतीवरही तक्रारदारांनी गंभीर आक्षेप घेतले आहेत. शिक्षक व कर्मचाऱ्यांची कथित मुस्कटदाबी, मनमानी बदल्या आणि मारहाणीच्या तक्रारींमुळे संस्थेच्या कारभाराबाबत नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

संस्थेच्या पदाधिकारी व संबंधित व्यक्तींच्या कारभाराबाबत दाखल तक्रारीनुसार निरीक्षक चौकशी क्रमांक १५२/२०२५ अंतर्गत चौकशी करण्यात आली. या चौकशी अहवालात शाळांच्या विविध बांधकामांमधील निविदा प्रक्रिया, आवश्यक परवानग्या, खर्चाचे विवरण आणि संस्थेच्या निधीच्या वापराबाबत अनेक गंभीर मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ३९अन्वये अहवाल सादर करण्यासह कलम ८३ अन्वये अभियोजन अथवा खटला दाखल करण्यासाठी पूर्वमंजुरी देण्याची विनंती करण्यात आली आहे.

निरीक्षक अहवालातील निष्कर्षानुसार, संबंधित बांधकामांसाठी अंदाजित खर्च १ कोटी ३७ लाख ३९ हजार ९७७ रुपये अपेक्षित असताना विद्यमान कार्यकारी मंडळाने २ कोटी ३९ लाख ९५ हजार ५०६ रुपये खर्च केल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे तब्बल १ कोटी २ लाख ५५ हजार ५२९ रुपये अतिरिक्त खर्च झाल्याचे निरीक्षक अहवालात नमूद आहे. या अतिरिक्त खर्चाची सखोल चौकशी करून त्याची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात येत आहे.

काही बांधकामांच्या निविदा प्रक्रिया योग्य पद्धतीने राबविण्यात न आल्याचे निरीक्षकांनी नोंदविले आहे. काही ठिकाणी निविदा प्रसिद्ध होण्यापूर्वीच कंत्राटदारांकडून निविदा प्राप्त झाल्याचे, तसेच मंजूर निविदेपेक्षा अधिक रक्कम देण्यात आल्याचे अहवालात नमूद आहे. त्यामुळे निविदा प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.शाळांमध्ये नवीन वर्गखोल्या, स्वच्छतागृहे व इतर बांधकामे करताना संबंधित स्थानिक प्रशासनाच्या आवश्यक परवानग्या घेतल्या नसल्याचे अहवालात नमूद आहे. काही बांधकामांसाठी ग्रामपंचायत, नगरपालिका किंवा संबंधित प्राधिकरणाची परवानगी उपलब्ध नसल्याचे निरीक्षकांनी स्पष्ट केले आहे.शाळा निधीच्या खात्यांचे वर्गीकरण करण्यासाठी ठराव न करता पाच शाळांकडील एकूण २ कोटी ७५ लाख ४२ हजार ५४५ रुपये संस्थेच्या खात्यात वर्ग करण्यात आल्याचे अहवालात नमूद आहे. तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये आयकर टीडीएस कपात न करणे आणि काही कंत्राटदारांकडून जीएसटी जमा न झाल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचे निरीक्षकांनी नमूद केले आहे.

संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश जगताप आणि सचिव सुभाष जावळे यांच्या कार्यपद्धतीबाबतही तक्रारदारांनी गंभीर आरोप केले आहेत. संस्थेतील आर्थिक व्यवहार आणि प्रशासनातील अनियमिततांबाबत प्रश्न उपस्थित करणारे शिक्षक, कर्मचारी आणि संबंधित व्यक्तींवर दबाव आणणे, त्यांची मुस्कटदाबी करणे तसेच विरोधी भूमिका घेणाऱ्यांना त्रास देण्याचे प्रकार होत असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. संस्थेतील लोकशाही पद्धतीने मत मांडण्याच्या अधिकारावर गदा येत असल्याची भावना संबंधितांनी व्यक्त केली आहे.

संस्थेचे सचिव आणि अध्यक्ष यांच्याकडून प्रदीप कुमार नागवडे यांना मारहाण करण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारदारांनी केला आहे. या कथित घटनेप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. संस्थेतील मतभेद आणि प्रशासकीय प्रश्न उपस्थित केल्यामुळे अशा प्रकारे दबाव आणला जात असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. या प्रकरणातील पोलीस तक्रार, उपलब्ध पुरावे आणि संबंधित व्यक्तींचे म्हणणे तपासून सत्य परिस्थिती समोर आणण्याची मागणी करण्यात आली आहे.

धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये निरीक्षक चौकशी अहवाल, संबंधित पदाधिकाऱ्यांचे खुलासे आणि उपलब्ध दस्तऐवजांचा विचार करून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ३९ आणि कलम ८३ अन्वये आवश्यक कारवाईसाठी पूर्वमंजुरी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या संपूर्ण प्रकरणातील आर्थिक व्यवहार, बांधकाम खर्च, निविदा प्रक्रिया, शाळांच्या निधीचा विनियोग, शिक्षकांच्या बदल्या आणि कर्मचाऱ्यांशी झालेल्या कथित गैरवर्तनाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी. तसेच चौकशी अहवालातील निष्कर्ष आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे जबाबदार व्यक्तींवर कायद्यानुसार फौजदारी व प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदारांकडून करण्यात येत आहे."शिक्षण संस्था ही विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि समाजाच्या विश्वासावर उभी असते. संस्थेचा निधी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी आणि संस्थेच्या प्रगतीसाठी वापरला जाणे अपेक्षित आहे. मात्र, आर्थिक व्यवहारांमधील अनियमिततेचे निरीक्षण, शिक्षकांच्या वारंवार बदल्या, कर्मचाऱ्यांची कथित मुस्कटदाबी आणि मारहाणीच्या तक्रारी अत्यंत गंभीर आहेत. या सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे. कोणतीही व्यक्ती पदाचा गैरवापर करून कायद्यापेक्षा मोठी नाही. त्यामुळे दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी," अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

निर्णय घेतल्याचा आरोप

संस्थेतील ज्येष्ठ इंग्रजी विषय शिक्षिका कांचन घुले यांच्या बाबतीतही अन्यायकारक प्रशासकीय निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित शिक्षिकेने शंभर टक्के निकाल दिलेला असतानाही वर्षभरात तब्बल तीन वेळा त्यांची बदली करण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. शैक्षणिक कामगिरी चांगली असतानाही वारंवार बदल्या का करण्यात आल्या, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. या बदल्या हेतुपुरस्सर करण्यात आल्याचा आरोप असून, त्यामागील कारणांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

तब्बल २३ हजार किलोमीटरची पदयात्रा, कृष्णा नाईक यांची मोशीतील 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला भेट!

■ पिंपरी (दै. संध्या)

भारत, नेपाळ आणि भूतानमध्ये सुमारे २३ हजार किलोमीटरचा पायी प्रवास करणारे म्हैसूरचे ३० वर्षीय योग अभ्यासक कृष्णा नाईक यांनी शनिवारी मोशीतील 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला भेट दिली. यावेळी त्यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती शिल्पाचे पूजन करून महाराजांच्या चरणी नमन केले.

या भेटीदरम्यान आमदार महेश लांडगे यांच्या सहकाऱ्यांनी नाईक यांच्याशी त्यांच्या पदयात्रेतील अनुभव आणि पुढील योजनांबाबत संवाद साधला. "या प्रवासात अनेक चढ-उतार आले. प्रत्येक आव्हानातून नवा मार्ग शोधण्याची सवय लागली," असे नाईक यांनी सांगितले.प्रवासात भेटलेली माणसे, वेगवेगळ्या प्रदेशांत आलेले अनुभव आणि त्यातून मिळालेली शिकवण पुस्तकातून मांडण्याचा नाईक यांचा मानस आहे. पदयात्रा पूर्ण झाल्यानंतर या प्रवासावरील माहितीपट प्रदर्शित करण्याचीही त्यांची योजना आहे. यासोबतच योग विषयात पीएच.डी. करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. मोशी सायकलिस्ट ग्रुपच्या सदस्यांसह युवा उद्योजक नितीन घिगे, दत्तात्रय सस्ते आणि स्वप्नील भुमकर आदींच्या हस्ते नाईक यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



पीसीसीओईआरच्या विद्यार्थ्यांचा अनाथ आणि दिव्यांगांसोबत दीपोत्सव

■ पिंपरी (दै. संध्या)

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदनशीलता, सामाजिक जबाबदारी आणि मानवतावादी मूल्यांची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) महाविद्यालयाच्या वतीने 'दीपोत्सव' हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. ॲप्लाइड सायन्स अँड ह्युमॅनिटीज विभागांतर्गत एफईएसए आणि लाईफ स्किल्स सेल यांच्या संयुक्त विद्यमाने या आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमांतर्गत प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून आकर्षक आकाशकंदील आणि हाताने रंगवलेले दिवे तयार केले. या वस्तूंची विक्री करून जमा झालेला निधी पिंपरी-चिंचवड येथील संत मोणी बाबा अनाथ आश्रम आणि झुंज दिव्यांग संस्थेला दिवाळी भेट म्हणून देण्यात आला. याशिवाय महाविद्यालयाच्या वतीने आश्रमाला धान्य, किराणा साहित्य, मिठाई आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी आश्रमातील मुलांसोबत विविध खेळ खेळत दिवाळीचा आनंद साजरा केला.

स्वामी गोविंददेव गिरी महाराजांच्या हस्ते भव्य गंगा आरती..!

■ मोशी (दै. संध्या)

श्रद्धेचा भव्य सण, छठ पूजेनिमित्त मोशी इंद्रायणी नदी घाटावर भव्य गंगा आरतीचे आयोजन करण्यात आले आहे. 15 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 5 वाजता पूज्य स्वामी गोविंददेव गिरी महाराजांच्या हस्ते भव्य गंगा आरती केली जाईल. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांसाठी मुख्यमंत्री निधीला 1,00,001 ची देणगी जाहीर करण्यात आली आहे.

विश्व श्रीराम सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. लालबाबू गुप्ता हे एका शिष्टमंडळासह मुंबई सचिवालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतील आणि मुख्यमंत्री मदत निधीला 1 लाख 1 रुपये चा धनादेश सादर करतील. याप्रसंगी स्वामी भरतानंद सरस्वतीजी महाराज (महासचिव, अखिल भारतीय संत समिती, महाराष्ट्र प्रदेश), भोसरी येथील भाजपचे भगवेधारी आमदार महेशदादा लांडगे, भाजप विधान परिषद आमदार अमित गोरखे आणि भाजपचे राज्य महासचिव राजेश पांडे,पूर्व राज्यमंत्री संजय उर्फ बालासाहेब भेगडे हे विशेष उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक आणि विश्व श्रीराम सेना या सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. लालबाबू गुप्ता यांनी दिली.

भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयाला नवे हायटेक रूप

■ पिंपरी(दै. संध्या)

भारतीय जनता पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा मध्यवर्ती कार्यालयाचे नूतनीकरण करून त्याला अत्याधुनिक स्वरूप देण्यात आले आहे. मोरवाडी येथील एम.एस.आर. कॅपिटलमध्ये उभारण्यात आलेल्या या नूतनीकृत कार्यालयाचे उद्घाटन भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्रदादा चव्हाण यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. फीत कापून आणि दीपप्रज्वलन करून नव्या कार्यालयाचे लोकार्पण करण्यात आले. या नव्या कार्यालयामुळे शहर भाजपच्या संघटनात्मक कामकाजाला नवी दिशा मिळणार असून कार्यकर्त्यांना कामासाठी आधुनिक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

'कार्यालय हे जनसेवेचे व्यासपीठ ठरेल'

यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न 'बापू' काटे म्हणाले, "पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्रदादा चव्हाण यांच्या शुभहस्ते दिमाखात उद्घाटन होणे हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. कार्यकर्त्यांना उत्तम सुविधा मिळाव्यात आणि तळागाळातील सामान्य नागरिकांच्या अडीअडचणी प्रभावीपणे सोडविता याव्यात, यासाठी हे कार्यालय आधुनिक आणि सुसज्ज करण्यात आले आहे. हे कार्यालय केवळ विटा-सिमेंटची वास्तू नसून प्रत्येक कार्यकर्त्याच्या ऊर्जेचे आणि जनसेवेचे व्यासपीठ असेल.

पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न 'बापू' काटे यांच्या अध्यक्षतेखाली हा उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुखवानी असोसिएट्स यांच्याविरुद्ध कोर्टाने घेतली दखल आणि मागवला खुलासा : काळे

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या लगतच सुरू असलेल्या नवीन बांधकाम प्रकल्पासाठी ५२ झाडांची अवैधपणे करण्यात आलेली वृक्षतोड आणि पालिकेची दिशाभूल करण्यासाठी झाडांच्या वयामध्ये करण्यात आलेल्या फेरफाराचे गंभीर प्रकरण आता न्यायालयात पोहोचले आहे. मे. सुखवानी असोसिएटस् (तर्फे भागीदार गुरुमुख जंगलदास सुखवानी) व वृक्ष अधिकारी महेश गारगोटे यांच्या या बेकायदेशीर कृत्याविरोधात रविराज काळे यांनी न्यायालयात धाव घेतली असून, पाचवे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पिंपरी यांच्या न्यायालयात यावर कायदेशीर लढा सुरू आहे. या खटल्यात रविराज बबन काळे यांच्या वतीने ॲड. सुप्रिया गायकवाड बाजू मांडत असून, या प्रकरणाची पुढील महत्त्वपूर्ण सुनावणी येत्या 18 नोव्हेंबर 2026 रोजी होणार आहे.

हे गंभीर प्रकरण न्यायालयात 'फौजदारी किरकोळ अन्वये दाखल असून, 6 नोव्हेंबर 2026 रोजी झालेल्या न्यायालयीन कामकाजानंतर कोर्टाने नोटीस पाठवलं आहे व गुरुमुख सुखवानी व महेश गारगोटे यांच्या कडून खुलासा मागवला आहे व पुढील सुनावणीची तारीख निश्चित केली आहे.पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अगदी शेजारी मे. सुखवानी असोसिएटस्चा नवीन बांधकाम प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पाच्या जागेवरील तब्बल ५२ झाडांची बेकायदेशीर व झाडांच्या वयात बदल करून अवैधपणे कत्तल करण्यात आली. इतकेच नव्हे तर, हेरिटेज (वारसा) झाडांच्या कठोर नियमांतून आणि दंडात्मक कारवाईतून वाचण्यासाठी विकासकाने झाडांच्या वयाची खोटी नोंद करून त्यात फेरफार केल्याचा गंभीर आरोप रविराज बबन काळे यांनी केला आहे. पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या आणि प्रशासनाची दिशाभूल करणाऱ्या या वृक्ष अधिकारी महेश गारगोटे व सुखवाणु असोसिट्स यांना कायद्याचा इम्पॅक्ट दाखवण्यासाठी हा लढा उभारण्यात आला आहे. आगामी 18 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या सुनावणी दरम्यान रविराज बबन काळे यांच्या वतीने त्यांच्या वकील ॲड. सुप्रिया गायकवाड न्यायालयात अधिकृत म्हणणे' सादर करणार आहेत. महापालिकेच्या नाकाखाली चाललेल्या या पर्यावरण हानी आणि फसवणुकीविरोधात ॲड. सुप्रिया गायकवाड न्यायालयात कोणती भूमिका मांडतात, याकडे आता संपूर्ण पिंपरी-चिंचवडमधील पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे

भीमथडी जत्रा BHIMTHADI JATRA

२० व्या भीमथडी जत्रेचे १६ ते २० डिसेंबर दरम्यान आयोजन : सौ.सुनंदा पवार

बारामती : दैनिक संध्या

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, शारदानगर (बारामती) संचलित शारदा महिला संघ व महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रामीण संस्कृतीचा शहरांशी साधलेला एक संवाद तसेच ग्रामीण महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे विक्री व प्रदर्शन म्हणजे भीमथडी जत्रा हे राष्ट्रीय प्रदर्शन होय. चालू वर्षात २० वी भीमथडी जत्रा दिनांक १६ ते २० डिसेंबर २०२६ या दरम्यान पुण्यात कृषी महाविद्यालय मैदान सिंचननगर शिवाजीनगर या ठिकाणी सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत भरणार असे आयोजक सौ.सुंनदा पवार यांनी जाहीर केले. महाराष्ट्राच्या संस्कृतीत जत्रा म्हणजे आनंदाचा,उत्साहाचा, खरेदीचा ग्राहकांच्या भेटीगाठी, राज्याची सांस्कृतिक आदान प्रदान, महिला बचत गटांची दर्जेदार उत्पादने, हस्तकला वस्तू, महाराष्ट्राचे अस्सल खाद्य पदार्थ, आणि ग्रामीण संस्कृतीचं दर्शन,या सर्व गोष्टी एकाच छताखाली असल्याने अनेक ग्राहकांना या जत्रेचा आनंद घेता येतो म्हणून भीमथडी जत्रेला गेली १९ वर्ष पुणेकरांनी भरभरून प्रेम दिल, पुणेकरांनी ग्रामीण महिलांच्या मेहनतीला आणि ग्रामीण कलाकारांच्या कलागुणांना दाद दिली.यातून महिला बचत गटांची आर्थिक उन्नती झाली. भीमथडी जत्रेतून अनेक महिला स्वताःच्या पायावर उभ्या राहिल्या. आयोजक सुनंदा पवार यांच्या कल्पक आणि कृतीशील मार्गदर्शनातून, मेहनतीतून भीमथडी जत्रा हा अभिनव उपक्रम नावारूपाला आला. भीमथडी जत्रा यंदा २० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. यावर्षी महाराष्ट्रासह पुणेकर ग्राहक भीमथडी जत्रेस भरभरून प्रतिसाद देतील असा मला विश्वास आहे. २० व्या भीमथडी जत्रेचे खास आकर्षण म्हणजे २० आकडा असणारे भव्य प्रवेशद्वार,आणि यशस्वी २० वर्षाची यशस्वी वाटचाल.तसेच नाविन्यपूर्ण उत्पादने असणा-या महिला बचत गटांचा सहभाग,कृषी उत्पादने, आदिवासी कलाकारांच्या नाविन्यपूर्ण वस्तू,ग्रामीण खाद्य पदार्थ यासह अनेक वेगवेगळे स्टॉल खरेदीसाठी उपलब्ध असणार आहेत.

किल्ले बनवा स्पर्धेचा सोमवारी निकाल

चाकण : दैनिक संध्या

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यशाली इतिहासाची आणि ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या वैभवशाली वारशाची ओळख नव्या पिढीला व्हावी, विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी आवड निर्माण व्हावी तसेच त्यांच्या कलागुणांना व सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या किल्ले बनवा स्पर्धेचा निकाल सोमवारी (दि. १६ नोव्हेंबर) जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मनीषा गोरे व उद्योजक विकास गोरे यांनी दिली. स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या सौजन्याने व स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानच्या वतीने चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा गोरे आणि महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत खेड तालुक्यातील दिडशे विद्यार्थ्यांनी भाग घेऊन आपल्या कल्पकतेचा वापर करून नैसर्गिक साधनसामग्रीच्या साहाय्याने घरच्या घरी ऐतिहासिक किल्ल्यांची प्रतिकृती तयार केली होती. येथील आंबेठाण चौकात असलेल्या स्व.आ. सुरेशभाऊ गोरे जनसंपर्क कार्यालयात सोमवारी सायंकाळी पाच वाजता किल्ले बनवा स्पर्धेचा अंतिम निकाल जाहीर करण्यात येणार आहे. स्पर्धेतील विजेत्या प्रथम क्रमांकास रोख ३,००० रुपये व ट्रॉफी ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या वतीने देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकास रोख २,००० रुपये व ट्रॉफी स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या वतीने तर, तृतीय क्रमांकास रोख १,००० रुपये व ट्रॉफी भामा इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने देऊन गौरव करण्यात येणार आहे.



जेजुरीत देवस्थानला २५ लाखांच्या 'क्युमिन्स २५० केव्हीए' जनरेटर सेटचे लोकार्पण

जेजुरी : दैनिक संध्या

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी येथे निबे लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश निबे परिवाराच्या वतीने २५ लाख रुपये किमतीचे 'क्युमिन्स २५० केव्हीए' जनरेटर सेट भेट देण्यात आले. श्री मार्तंड देवस्थान न्यासाच्या वतीने अध्यक्ष ॲड विश्वास पानसे, विश्वस्त मंगेश घोणे यांनी देणगीदार गणेश निबे व त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करून त्यांचे देवस्थानच्या वतीने आभार मानले.

बारामतीत पोलीस-पत्रकारांचे संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिर

बारामती शहर पोलीस स्टेशनच्या आवारात सोमवारी भव्य रक्तदान शिबिर; नागरिकांना उत्स्फूर्त सहभागाचे आवाहन

■ बारामती (दै. संध्या)



लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील सत्य घटना,सामान्य नागरिकांचे प्रश्न आणि लोकहिताच्या बाबी अहोरात्र समाजासमोर आणण्यासाठी कार्यरत असलेल्या पत्रकार बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधून सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी बारामती शहर पोलीस स्टेशन व पत्रकार बांधव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय पत्रकार दिन दरवर्षी १६ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. याच दिवशी १९६६ मध्ये Press Council of India ने कार्य सुरू केले होते. हा दिवस भारतातील स्वतंत्र,जबाबदार आणि नैतिक पत्रकारितेचे प्रतीक म्हणून साजरा केला जातो.

समाजातील अन्यायाला वाचा फोडणे,नागरिकांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविणे, लोकहिताच्या बाबींवर प्रकाश टाकणे,संकटकाळात वस्तुनिष्ठ माहिती समाजापर्यंत पोहोचविणे आणि लोकशाहीतील संवाद जिवंत ठेवणे या कार्यात पत्रकार बांधव सातत्याने योगदान देत असतात.अशा पत्रकार बांधवांच्या राष्ट्रीय पत्रकार दिनाला केवळ शुभेच्छांपुरते मर्यादित न ठेवता समाजाला प्रत्यक्ष जीवनदान देणाऱ्या रक्तदानाच्या सेवेशी जोडण्याचा हा अभिनव सामाजिक उपक्रम आहे.

सदर रक्तदान शिबिराचे आयोजन मा.पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामीण श्री. संदीप सिंह गिल्ल,मा.अपर पोलीस अधीक्षक,बारामती विभाग श्री.गणेश बिरादार,मा.उपविभागीय पोलीस अधिकारी,बारामती विभाग श्री.चैतन्य वसंतराव कदम तसेच परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्रीमती मनीषा ओमासे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. बारामती शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी,पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच बारामतीतील पत्रकार बांधव यांच्या संयुक्त सहभागातून या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. रक्त हे कृत्रिमरीत्या तयार करता येत नाही.अपघातग्रस्त रुग्ण,मोठ्या शस्त्रक्रिया होणारे रुग्ण,प्रसूतीदरम्यान गंभीर रक्तस्राव झालेल्या माता,कर्करोगावरील उपचार घेणारे रुग्ण,थॅलेसेमिया व इतर रक्तविकार असलेले रुग्ण अशा अनेकांना वेळेवर सुरक्षित रक्ताची आवश्यकता असते. जागतिक आरोग्य संघटनेनुसार सुरक्षित रक्त जीवन वाचवते आणि एका रक्तदानातून रक्ताचे विविध घटक वेगळे करून तीन रुग्णांपर्यंत मदत होऊ शकते.रक्ताचा साठा मर्यादित कालावधीसाठीच सुरक्षितपणे ठेवता येत असल्यामुळे रक्तपेढ्यांमध्ये सातत्याने पुरेसा साठा उपलब्ध राहण्यासाठी निरोगी व पात्र नागरिकांकडून नियमित स्वैच्छिक रक्तदान अत्यंत आवश्यक आहे. WHO ने स्वैच्छिक व विनामूल्य रक्तदात्यांना सुरक्षित आणि टिकाऊ रक्तपुरवठ्याचा कणा म्हटले आहे.पात्र व निरोगी व्यक्तीने वैद्यकीय देखरेखीखाली रक्तदान केल्यास शरीर रक्तातील घटकांची नैसर्गिकरीत्या पुनर्भरण प्रक्रिया सुरू करते. रक्तदानानंतर प्लाझमाची भरपाई साधारण २४ तासांत होते,तर लाल रक्तपेशी पूर्णपणे भरून येण्यासाठी साधारण चार ते सहा आठवडे लागू शकतात.त्यामुळे योग्य वैद्यकीय निकष,आवश्यक अंतर आणि तज्ज्ञांचा सल्ला पाळून केलेले रक्तदान सुरक्षित मानले जाते.

रक्तदानापूर्वी रक्तदात्याची प्राथमिक आरोग्य तपासणी केली जाते.त्यामध्ये आरोग्यविषयक इतिहास,प्राथमिक शारीरिक तपासणी आणि हिमोग्लोबिन तपासणीचा समावेश असतो. भारत सरकारच्या अद्ययावत रक्तदाता निवड मार्गदर्शक तत्त्वांनुसार रक्तदात्याची सुरक्षितता आणि रक्त स्वीकारणाऱ्या रुग्णाची सुरक्षितता या दोन्हींना सर्वोच्च प्राधान्य दिले जाते.

रक्तदानाचा सर्वांत मोठा फायदा मात्र सामाजिक आहे.आपल्या शरीरातून दिलेले काही मिलीलीटर रक्त एखाद्या अनोळखी व्यक्तीच्या उपचाराचा अत्यंत महत्त्वाचा आधार ठरू शकते.अपघातात गंभीर जखमी झालेला युवक,प्रसूतीदरम्यान रक्ताची आवश्यकता असलेली माता किंवा उपचारासाठी रक्ताची प्रतीक्षा करणारा रुग्ण यांच्यासाठी वेळेवर मिळणारे रक्त म्हणजे प्रत्यक्ष जीवनाची संधी असू शकते.

पोलीस आणि पत्रकार एकत्र, समाजासाठी एक पाऊल पुढे

पोलीस नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर कार्यरत असतात,तर पत्रकार समाजातील वास्तव नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने कार्यरत असतात.या दोन महत्त्वपूर्ण घटकांनी राष्ट्रीय पत्रकार दिनी "समाजासाठी आपण आणखी काय देऊ शकतो?" या भावनेतून रक्तदानाचा उपक्रम हाती घेतला आहे.

राष्ट्रीय पत्रकार दिन हा केवळ पत्रकारांचा गौरव करण्याचा दिवस नसून मुक्त,निष्पक्ष,जबाबदार आणि समाजहिताची जाणीव असलेल्या पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित करण्याचा दिवस आहे. सत्याचा शोध घेताना वेळ, परिस्थिती,ऊन-पाऊस किंवा संकटाची पर्वा न करता घटनास्थळी पोहोचणाऱ्या पत्रकार बांधवांच्या सामाजिक योगदानाचा सन्मान रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमातून करणे ही या शिबिरामागील प्रमुख भावना आहे.

बारामती शहर पोलीस आणि पत्रकार बांधवांच्या वतीने बारामती शहर व परिसरातील व्यापारी,डॉक्टर ,वकील,शिक्षक,विद्यार्थी,सामाजिक संस्था,युवक मंडळे,शासकीय व खासगी कर्मचारी,महिला-पुरुष तसेच सर्व पात्र नागरिकांना आवाहन करण्यात येते की,दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून बारामती शहर पोलीस स्टेशनच्या आवारात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून स्वेच्छेने रक्तदान करावे.रक्तदानासाठी अंतिम पात्रता शिबिरातील वैद्यकीय अधिकारी तपासणीनंतर निश्चित करतील. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही गैरसमजाला बळी न पडता वैद्यकीय मार्गदर्शन घेऊन रक्तदानासाठी पुढे यावे.

"आपण दिलेले रक्त कोणाला मिळणार हे आपल्याला कदाचित माहीत नसेल; पण त्या व्यक्तीसाठी आपण जीवनाची आशा ठरू शकतो."

उद्योजकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार

■ चाकण (दै. संध्या)



चाकण दौऱ्यादरम्यान महाराष्ट्राचे युवा नेतृत्व आदित्य ठाकरे यांची भेट घेण्याची संधी मिळाली. यावेळी चाकण औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, अद्याप प्रलंबित असलेले प्रश्न, आजपर्यंत झालेल्या उपाययोजना तसेच प्रशासनाकडून अपेक्षित असलेले सहकार्य याबाबत सविस्तर चर्चा केली.

शिव उद्योग सहकार सेना महासंघाच्या माध्यमातुन पुढाकार घेण्यात आला. राष्ट्रीय अध्यक्ष हर्षल नेगिनहाल, प्रदेशाध्यक्ष उदय भोसले, प्रदेश कार्याध्यक्ष एहतेशाम पेणवाला व प्रदेश सरचिटणीस सतीश नायर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पुणे जिल्हा सचिव नवीदजी मगदूम यांच्या सहकार्याने उद्योजकांच्या प्रश्नांवर काम करण्याची संधी मिळत आहे. या भेटी दरम्यान शिव उद्योगचे खेड तालुका अध्यक्ष निलेश नितनवरे उपस्थित होते. शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास धनवटे, खेडचे आमदार बाबाजी काळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. चाकणचे माजी नगराध्यक्ष शेखर घोगरे यांच्या पुढाकारामुळे हा महत्त्वपूर्ण संवाद शक्य झाला असल्याचे उद्योजक प्रशांत तुळवे यांनी सांगितले. उद्योजकांचे प्रश्न केवळ मांडून न थांबता त्यावर ठोस उपाययोजना, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी काम करणे हीच आमची भूमिका आहे. उद्योजकांच्या हक्कांसाठी, औद्योगिक विकासासाठी आणि स्थानिक तरुणांच्या रोजगार निर्मितीसाठी आपला हा प्रयत्न यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे अखिल भारतीय शिव उद्योग सहकार सेना महासंघाचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रशांत तुळवे यांनी सांगितले.

विद्यानगरमध्ये भरवस्तीत घरफोडी

■ जेजुरी (दै. संध्या)



दि 15 जेजुरी शहरातील विद्यानगर परिसरात भरवस्तीत घरफोडीची घटना घडली असून, अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप व कडी-कोयंडा तोडून सुमारे ३ लाख १० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली आहे. याप्रकरणी जेजुरी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विद्यानगर येथील वैष्णवी जनरल स्टोअर्सचे मालक सोमनाथ उर्फ राजू वासकर हे शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी कुटुंबीयांसह बाहेरगावी गेले होते. रात्री सुमारे ११ वाजता घरी परतल्यानंतर घराच्या दरवाजाचे कुलूप व कडी-कोयंडा तोडलेल्या अवस्थेत आढळून आले. घरात पाहणी केली असता लोखंडी गोदरेज कपाटाचे लॉक तोडून त्यातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरीस गेल्याचे निदर्शनास आले.

दोन तोळे वजनाचे सोन्याचे गंठण, २५ अर्धा तोळे वजनाची सोन्याची कर्णफुले, अर्धा तोळे वजनाची सोन्याची डोरले तसेच १ लाख ६० हजार रुपयांची रोख रक्कम, असा एकूण ३ लाख १० हजार रुपयांच्या ऐवजाचा समावेश आहे. अज्ञात चोरट्याचा शोध घेण्यासह चोरीच्या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार नंदकुमार पिंगळे करीत आहेत.

कांद्याची आवक घटल्याने भाव तेजीत

■ चाकण (दै. संध्या)



खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांद्याची आवक घटल्याने भाव तेजीत राहिले. पालेभाज्यांची भरपूर आवक झाली. एकूण उलाढाल ६ कोटी ४५ लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ७५० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ४,८०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,७५० क्विंटल झाली. बटाट्याला २ हजार रुपये कमाल भाव मिळाला. लसणाची एकूण आवक ६० क्विंटल झाली. लसणाचा कमाल भाव १८ हजार रुपयांवर स्थिर राहिला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ४२५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला २ हजार रुपयांपासून ते ४ हजार रुपयांपर्यंत कमाल भाव मिळाला.

* शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे कांदा - एकूण आवक - ७५० क्विंटल. भाव क्रमांक - १. ४,८०० रुपये, भाव क्रमांक २. ३,५०० रुपये, भाव क्रमांक ३. २,००० रू. बटाटा - एकूण आवक - १,७५० क्विंटल.भाव क्रमांक १. २,००० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.१,००० रुपये.

फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ४१० क्विंटल (८०० ते १,६०० रू.), कोबी - २३० क्विंटल (४०० ते ८०० रू.), फ्लॉवर - २६५ क्विंटल (५०० ते ७०० रु.), वांगी - ९८ क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), भेंडी - ९४ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), दोडका - ५६ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), कारली - ७० क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ५० क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ४० क्विंटल (२,५०० ते ४,५०० रु.), फरशी - ३८ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), वालवड - ६४ क्विंटल (४,००० ते ५,००० रुपये), ढोबळी मिरची - १५२ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), चवळी - ५० क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), शेवगा - २० क्विंटल (५,००० ते ७,००० रु.), गाजर - १६० क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), गवार - ७६ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), आले - १७५ क्विंटल (४,००० ते ७,००० रु.), वाटाणा - ९० क्विंटल (८,००० ते १०,००० रु.),

चाकण नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक तीनमध्ये नमो उद्यानाचे काम प्रगतीपथावर

■ चाकण(दै. संध्या)

चाकण नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक तीन मधील नमो उद्यानाचे काम चाकण नगर परिषदेच्या प्रथम महिला उपनगराध्यक्षा सुवर्णाताई श्यामभाऊ राक्षे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगतीपथावर आहे.

सुवर्णाताई राक्षे यांनी उपनगराध्यक्षा पदाची सूत्रे हाती घेताच चाकण व परिसराच्या विकास कामांना गती देण्याचे काम त्यांनी केले. चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव व नगराध्यक्षा मनीषाताई गोरे व गटनेते नितीन भाऊ गोरे यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक तीन मध्ये नमो उद्यानचे काम गेल्या सहा महिन्यापूर्वी मंजूर करण्यात आले होते. त्यासाठी सुमारे सव्वा कोटी रुपये निधी मंजूर असून हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. हे काम



पूर्ण होऊन चाकणकर नागरिकांसाठी हे उद्यान लवकरच खुले होणार आहे, असे प्रथम महिला उपनगराध्यक्षा सुवर्णाताई राक्षे यांनी सांगितले. दरम्यान, सुवर्णाताई राक्षे यांनी सांगितले की, प्रभाग क्रमांक तीन मध्ये सुरू असलेल्या कामाला चाकण नगरपरिषद प्रशासनासह राक्षेवाडीतील स्थानिक ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभत आहे. गेल्या अनेक वर्षापासून या भागात नमो उद्यान सारखे प्रकल्प व्हावेत, अशी ग्रामस्थांची मागणी होती. यासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. नमो उद्यान कामाची पाहणी चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा मनीषाताई गोरे, गटनेते नितीनभाऊ गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी , प्रथम महिला उपनगराध्यक्षा सुवर्णाताई राक्षे, नगरसेविका साधना गोरे, रूपाली कांडगे, आरती परदेशी, पुनम शेवकरी, स्वाती लेंडघर, अनिता घोगरे, नगरसेवक प्रकाश गोरे, अनिल लोहकरे, मंगेश कांडगे, हर्षद लेंडघर आदींनी केली. शिवसेनेचे चाकण शहर प्रमुख व नगरसेवक महेश शेवकरी, उद्योजक श्यामभाऊ राक्षे, उपशहर प्रमुख किरण कौटकर, प्रकाश राजनकर, राहुलदादा कांडगे, श्रीकांत जाधव, शहाजी राक्षे, विकास राक्षे आदींनी या उपक्रमाचे कौतुक केले.



नमो उद्यानचे काम गेल्या सहा महिन्यापूर्वी मंजूर

चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव व नगराध्यक्षा मनीषाताई गोरे व गटनेते नितीन भाऊ गोरे यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक तीन मध्ये नमो उद्यानचे काम गेल्या सहा महिन्यापूर्वी मंजूर करण्यात आले होते. त्यासाठी सुमारे सव्वा कोटी रुपये निधी मंजूर असून हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. हे काम पूर्ण होऊन चाकणकर नागरिकांसाठी हे उद्यान लवकरच खुले होणार आहे, असे प्रथम महिला उपनगराध्यक्षा सुवर्णाताई राक्षे यांनी सांगितले. प्रभाग क्रमांक तीन मध्ये सुरू असलेल्या कामाला चाकण नगरपरिषद प्रशासनासह राक्षेवाडीतील स्थानिक ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभत आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



कृषी विभागाचे रब्बी हंगाम व एफएफएस खत बुकिंग ॲपविषयी मार्गदर्शन शिबिर संपन्न

यवत : दैनिक संध्या

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना रब्बी हंगामाच्या पूर्वतयारीसाठी आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी तालुका कृषी अधिकारी अजिंक्य दुधाने व मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली विविध मोहिमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर दौंड तालुक्यातील खामगाव येथे नुकतेच शेतकऱ्यांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिर पार पडले. या कार्यक्रमात शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढावा आणि शेतकऱ्यांना सुलभतेने खते उपलब्ध व्हावीत, यासाठी एफएफएस (FFS) खत बुकिंग ॲप बाबत उपकृषी अधिकारी संतोष मोरे यांनी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. या ॲपच्या माध्यमातून शेतकरी घरबसल्या किंवा आपल्या मोबाईलवरून खतांचे नियोजन व बुकिंग कसे करू शकतात, याविषयी मोलाचे मार्गदर्शन त्यांनी केले. तसेच, रब्बी हंगामातील पिकांचे व्यवस्थापन करताना बीज प्रक्रिया, बियाण्यांची उगवण क्षमता तपासणे आणि पिकांची जोपासना कशी करावी, याविषयी सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. योग्य बीज प्रक्रियेमुळे पिकांचे रोगांपासून संरक्षण होते आणि उत्पादनात वाढ होते, असे त्यांनी स्पष्ट केले. सदर कार्यक्रमास तुकाराम मदने, किसन टिळेकर, तुषार शेळके, तुषार यादव, योगेश टिळेकर, कोंडीबा नागवडे, भालचंद्र नागवडे, पोपट नागवडे, बाळासाहेब नागवडे, विकास शेळके यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



रवंदे लिखित "कलर्स" पुस्तकाचे प्रकाशन

यवत : दैनिक संध्या

विलास रवंदे यांनी लिहिलेल्या व मिहान पब्लिकेशन यांनी प्रकाशित केलेल्या "कलर्स" या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन आज ज्येष्ठ साहित्यिक आनंद माडगूळकर यांच्या हस्ते रवंदे नानजकर सभादालन,श्रीराम सोसायटी,वारजे, पुणे येथे करण्यात आले. या समारंभाच्या वेळी सौ. लता रवंदे ,रोटरीचे माजी प्रांतपाल मोहन पालेषा,रोटरीचे अनेक सभासद,रवंदे मित्र परिवार व कुटुंबीय मोठ्या संख्यने उपस्थित होते. लेखकाचे मनोगत व्यक्त करताना विलास रवंदे म्हणाले की, "मैत्री म्हणजे केवळ मैत्रीदिन साजरा करणे किंवा फ्रेंडशिप बँड बांधणे एवढ्यापुरती मर्यादित नसून ती आयुष्यभर जपण्याची आणि विकसित करण्याची भावना आहे.बालपणीचे मित्र,महाविद्यालयीन सहकारी,व्यावसायिक मित्र,कुटुंबीय आणि नातेवाईक या सर्वांचा आपल्या जीवनप्रवासात महत्त्वाचा वाटा असतो. संघर्षाच्या काळात मित्र आधार देतात,विचारांना नवी दिशा देतात आणि नकळत व्यक्तिमत्त्व घडवतात.प्रत्येक मित्र आपल्याला वेगवेगळे अनुभव, विचार आणि आनंद देत असतो. त्यामुळेच 'कलर्स ऑफ फ्रेंडशिप' ही संकल्पना पुस्तकातून मांडली असून,मैत्रीचे विविध रंग आणि तिच्यामुळे समृद्ध होणारा जीवनप्रवास उलगडण्याचा प्रयत्न केला आहे, " आनंद माडगूळकर म्हणाले "माणसाच्या जीवनात अनेक रंग असतात आणि हे रंग भरण्यासाठी अनेक माणसे आयुष्यात येत असतात. विलास रवंदे यांनी आपल्या आयुष्यात भेटलेल्या विविध व्यक्तींचा मागोवा या पुस्तकात घेतला आहे. प्रत्येक व्यक्तीचे गुण ओळखून ते बारकाईने शब्दबद्ध केले आहेत. बदलीच्या नोकरीमुळे वेगवेगळ्या ठिकाणी भेटलेली नवी माणसे, नवीन संस्था आणि विविध प्रकारचे संवाद यांचे त्यांनी सूक्ष्म निरीक्षण केले आहे. प्रत्येकाविषयी त्यांच्या मनात कृतज्ञतेची भावना आहे. कोणाचे दोष न शोधता त्यांच्यातील गुण अधोरेखित केले आहेत. हैदराबादची वाडा संस्कृती असो किंवा निवृत्तीनंतरची कट्टा संस्कृती, प्रत्येक ठिकाणी त्यांनी नवे मित्र जोडले आणि त्यांच्यातील गुणांची पारख केली. माणसाचे माणूसपण ओळखणारा आणि मैत्रीचे नाते जपणारा हा लेखक आहे " असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

'कोण होणार करोडपती'च्या मंचावर माधुरी दीक्षित आणि अशोक सराफ यांची धमाल

■ पुणे (दै. संध्या)

'कोण होणार करोडपती'च्या आगामी विशेष भागात प्रेक्षकांना मनोरंजनाची मोठी मेजवानी मिळणार आहे. यावेळी माधुरी दीक्षित समोर हॉट सीट वर बसणार आहेत अशोक सराफ आणि संकर्षण कऱ्हाडे. यावेळी गप्पांच्या ओघात संकर्षण कऱ्हाडे यानं माधुरी दीक्षित आणि अशोक सराफ या दोघांमधील एक भन्नाट आणि अनोखा समान धागा शोधून काढला. संकर्षण म्हणाला की, "माझ्यासोबत आज अशा दोन व्यक्ती आहेत, ज्यांनी आपला खोकला देखील प्रसिद्ध केला आहे." संकर्षणचा हा रोख माधुरी दीक्षितच्या 'हम आपके है कौन' चित्रपटातील प्रसिद्ध 'ऊहू ऊहू' आणि अशोक सराफ यांच्या 'धूमधडाका' चित्रपटातील अजरामर 'वख्खा विख्खी वूक्खु' या संवादांकडे होता. संकर्षणने या दोन्ही आयकॉनिक खोकल्यांमागची नेमकी कथा विचारली असता, दोन्ही कलाकारांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

संकर्षणच्या प्रश्नाला उत्तर देताना माधुरी दीक्षितने 'हम आपके है कौन' चित्रपटाच्या शूटिंगचा किस्सा सांगितला. ती म्हणाली, "चित्रपटात एक असा सीन होता जिथे फोन उचलल्यावर समोरच्या व्यक्तीला न बोलता कळायला हवं की पलीकडे कोण आहे. यासाठी काहीतरी वेगळे आणि युनिक हवं होतं. त्यावर दिग्दर्शक आणि टीमनं बराच विचार केला. आम्ही वेगवेगळे आवाज काढून पाहिले आणि शेवटी हे 'ऊहू ऊहू' फायनल झालं." दुसरीकडे, अशोक सराफ यांनीही त्यांच्या गाजलेल्या 'वख्खा विख्खी वूक्खु' या संवादामागचे गुपित उघड केले. अशोक मामांनी सांगितलं की, "त्या सीनमध्ये मला हातात पाईप घेऊन तो ओढायचा होता. त्या पाईपमुळे संवाद बोलताना मला खरोखरच जोरात खोकला आला. मात्र, मी तो सीन थांबवला नाही आणि त्याच खोकल्याच्या सुरात तो संवाद पुढे सुरू ठेवला." माधुरी दीक्षित आणि अशोक सराफ यांच्या या दिलखुलास गप्पा आणि जुन्या आठवणींमुळे 'कोण होणार करोडपती'चा हा भाग प्रेक्षकांसाठी अत्यंत खास आणि मनोरंजक ठरणार यात शंका नाही. पहात रहा, 'कोण होणार करोडपती' १३ नोव्हेंबर, रात्री ९ वाजता, सोनी मराठी वाहिनीवर आणि सोनी लिव ॲपवर.



७,९५५ भारतीय खलाशांना पुण्यात आदरांजली

■ पुणे (दै. संध्या)



दोन महायुद्धांमध्ये मित्र राष्ट्रांच्या व्यापारी जहाजांवर सेवा बजावताना प्राण गमावलेल्या ७,९५५ भारतीय खलाशांच्या स्मृतींना इंडियन मेरिटाइम फाउंडेशनतर्फे(आयएमएफ)शनिवारी (१४ नोव्हेंबर) बंड गार्डन येथील सीमेन वॉर मेमोरियलमध्ये अभिवादन करण्यात आले. रिमेंबरन्स डे २०२६निमित्त आयोजित या कार्यक्रमात पुष्पचक्र अर्पण करून शहीद खलाशांना आदरांजली वाहण्यात आली.

पुणे मेट्रोच्या बांधकामामुळे काही वर्षे खंडित झालेला हा पूर्ण स्वरूपातील स्मरण सोहळा यंदा पुन्हा सुरू करण्यात आला.आयएमएफचे सदस्य कॅप्टन आनंद दीक्षित आणि कॅप्टन रबी मिश्रा यांनी पुणे महानगरपालिकेशी केलेल्या पाठपुराव्यामुळे बंड गार्डनचे मूळ स्वरूप पुनर्स्थापित झाले आणि स्मारक परिसरात पुन्हा हा कार्यक्रम आयोजित करणे शक्य झाले. आयएमएफचे अध्यक्ष कमोडोर अजय चिटणीस यांनी आपल्या भाषणात दोन महायुद्धांदरम्यान भारतीय व्यापारी नौदलातील खलाशांनी पाणबुड्यांचे हल्ले, हवाई हल्ले आणि समुद्री सुरुंगांचा धोका पत्करून अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरू ठेवण्यासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण केले. व्यापारी नौदलातील खलाशांच्या बलिदानाला अपेक्षित मान्यता मिळालेली नाही, अशी खंत व्यक्त करून तरुण पिढीला त्यांच्या कार्याची माहिती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले."हे खलाशी समुद्रात हरवले असतील,पण इतिहासातून कधीही हरवता कामा नयेत,"असे भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले. त्यानंतर उपस्थितांनी एक मिनिट स्तब्धता पाळली.भारत सरकारचे माजी नौकानयन सल्लागार कॅप्टन सुधीर नाफडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पैसा, प्रतिष्ठेचा अहंकार आणि कायद्याची भीती संपत चालली आहे का?

■ बोरी (दै. संध्या)

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत माणसाकडे पैसा वाढत आहे; मात्र माणुसकी, संयम, सहनशीलता आणि एकमेकांबद्दलचा आदर कमी होत चालल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. पैशाचा वाढता अहंकार, प्रतिष्ठेची खोटी मिजास, राजकीय किंवा सामाजिक पाठबळाचा गैरसमज आणि कायद्याचा धाक राहिलेला नाही, अशा मानसिकतेमुळे समाजातील वातावरण चिंताजनक बनत आहे.

पूर्वी एखाद्या किरकोळ कारणावरून वाद झाला, तरी गावातील ज्येष्ठ मंडळी मध्यस्थी करून तो मिटवत असत. दोन शब्द समजुतीचे सांगितले की वाद संपायचा. मात्र आज परिस्थिती बदलत आहे. साध्या बोलण्यावरून गैरसमज, गैरसमजातून वाद, वादातून शिवीगाळ, शिवीगाळीतून हाणामारी आणि काही वेळा थेट जीव घेण्यापर्यंत मजल जात आहे. एखाद्याने आपल्याला उलट उत्तर दिले, आपला अपमान केला किंवा आपल्या म्हणण्याप्रमाणे वागले नाही, तर त्याला धडा शिकवण्याची मानसिकता वाढत आहे. ही समाजासाठी अत्यंत घातक बाब आहे. आज काही लोकांकडे पैसा, गाडी, बंगला आणि सामाजिक प्रतिष्ठा आली की आपण कोणालाही काहीही बोलू शकतो, कोणाशीही वाद घालू शकतो, आपल्याला कोणी काही करू शकत नाही, अशी भावना निर्माण होते.

ब्रह्माकुमारीज केंद्रात सायबर कायदा आणि डिजिटल जागरूकता सत्र

■ मुंबई (दै. संध्या)

वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विक्रोळी पूर्व येथील ब्रह्माकुमारीज केंद्रात सोमवारी (१६ नोव्हेंबर) 'सायबर कायदा आणि डिजिटल जागरूकता' या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत हे सत्र होणार आहे.

या सत्रात सायबर कायद्याची मूलभूत माहिती, ऑनलाईन व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी, सोशल मीडियाचा जबाबदार वापर, डिजिटल फसवणुकीपासून संरक्षण तसेच इंटरनेटचा सकारात्मक आणि सुरक्षित वापर या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. डिजिटल युगात नागरिकांना सायबर धोक्यांची माहिती व्हावी आणि संभाव्य फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक दक्षता घेता यावी, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या सत्राचे संयोजन अमिता दीदी हळदणकर यांनी केले आहे. हे सत्र ब्रह्माकुमारीज, शांतिवन गार्डन, बीएमसी स्कूलजवळ, विक्रोळी पूर्व, मुंबई येथे होणार आहे. सत्रासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून, इच्छुकांनी गुगल फॉर्म भरून आपली जागा निश्चित करावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

भारताचे पहिले पंतप्रधान " पंडित जवाहरलाल नेहरू" यांच्या जयंती निमित्त अभिवादन

■ पुणे (दै. संध्या)

आधुनिक व समृद्ध भारताचे शिल्पकार भारताचे पहिले पंतप्रधान " पंडित जवाहरलाल नेहरू " यांच्या जयंती निमित्त पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे नेहरू यांच्या पुतळ्यास जेष्ठ नेते उल्हास पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

या प्रसंगी प्रशांत जगताप (शहराध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, पुणे पूर्व), दीप्ती चौधरी (शहराध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, पुणे पश्चिम),अंकुश काकडे, संजय बालगुडे, गोपाळ तिवारी, नरेंद्र व्यवहारे, आशिष व्यवहारे, आब्बा जगताप, द.स.पुळेकर इत्यादी उपस्थित होते. या प्रसंगी इंस्पायरिंग दिव्यांग फौंडेशन संस्थेतील दिव्यांग लोकांना मिठाईचे वाटप करण्यात आले. पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वातंत्र्योत्तर भारताच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे, शिक्षण, विज्ञान, औद्योगिकीकरण, लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांच्या माध्यमातून आधुनिक भारताचा पाया रचणारे भारताचे पहिले पंतप्रधान होते .कार्यक्रमाचे आयोजन आशिष व्यवहारे यांनी केले.



हवेली खरेदी-विक्री संघाच्या निवडणुकीत मालमत्तांच्या हिशेबाचा मुद्दा ऐरणीवर

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

हवेली तालुका खरेदी-विक्री संघाच्या निवडणुकीचा बिगुल वाजला असतानाच संघाच्या मागील कारभारावरून नवे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी स्वर्गीय सहकार महर्षी अण्णासाहेब मगर यांनी उभ्या केलेल्या सहकार चळवळीतील महत्त्वाच्या संस्थेची आजची अवस्था नेमकी काय आहे? शेतकऱ्यांच्या हितासाठी स्थापन झालेल्या या संस्थेचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांना कितपत झाला? संस्थेच्या मालमत्ता, आर्थिक व्यवहार आणि उत्पन्नाचे स्रोत यांचा सभासदांसमोर पारदर्शक हिशेब का मांडला जात नाही? असे अनेक सवाल आता उपस्थित केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते, वृक्षमित्र संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माहिती सेवा समितीचे अध्यक्ष चंद्रकांत गोविंद वारघडे पाटील यांनी संघाच्या मागील कारभाराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. संघाच्या मालकीच्या मालमत्ता, पेट्रोल पंप, भूखंडांची विक्री, इमारतीचे बांधकाम, भाड्याचे उत्पन्न आणि फिक्स्ड डिपॉझिट याबाबत सविस्तर माहिती सभासदांसमोर जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

अण्णासाहेब मगर यांचे स्वप्न नेमके कुठे हरवले?

स्वर्गीय सहकार महर्षी अण्णासाहेब मगर यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे स्वप्न पाहिले होते. शेतमालाला योग्य बाजारपेठ, शेतकऱ्यांना आवश्यक वस्तूंचा पुरवठा, आर्थिक व्यवहारांमध्ये सहकार्य आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, या उद्देशाने त्यांनी बाजार समिती, साखर कारखाना आणि खरेदी-विक्री संघ यांसारख्या संस्था उभारण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र आज या संस्थांच्या कामकाजाकडे पाहताना मूळ उद्देश आणि प्रत्यक्ष कार्यपद्धती यामध्ये किती अंतर निर्माण झाले आहे, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. सहकाराच्या नावाखाली उभ्या राहिलेल्या संस्था शेतकऱ्यांच्या विकासासाठी कार्यरत राहिल्या पाहिजेत. परंतु संस्थेच्या मालमत्तांचा आणि आर्थिक साधनसंपत्तीचा नेमका उपयोग कोणासाठी झाला, हा प्रश्न उपस्थित होत आहे. पेट्रोल पंप, भूखंड गेले कुठे? मालमत्तांच्या व्यवहारांचा हिशेब द्या. हवेली तालुका खरेदी-विक्री संघाच्या मालकीचा पेट्रोल पंप आणि विविध भूखंड व मालमत्ता असल्याचे सांगितले जाते. मात्र आज या मालमत्तांची नेमकी स्थिती काय आहे? त्या विकण्यात आल्या असतील तर कोणत्या प्रक्रियेद्वारे विक्री झाली? विक्रीची किंमत किती होती? संबंधित व्यवहारांना संचालक मंडळाची आणि सर्वसाधारण सभेची मान्यता होती का? विक्रीतून प्राप्त झालेली रक्कम कोणत्या खात्यात जमा झाली आणि तिचा विनियोग कोणत्या कारणासाठी करण्यात आला?

ताबा कागदपत्रे सार्वजनिक होणे गरजेचे

या दाव्यांची सत्यता तपासण्यासाठी मूळ करारनामा, बांधकाम खर्च, जमिनीचे मूल्यांकन, भागीदारीच्या अटी, मंजूर आराखडा आणि अंतिम ताबा कागदपत्रे सार्वजनिक होणे गरजेचे आहे. संघाला केवळ १० टक्के हिस्सा मिळाला असेल तर त्यामागील आर्थिक गणित काय होते? हा व्यवहार संघाच्या हिताचा होता की संस्थेला आर्थिक नुकसान सहन करावे लागले? याची स्वतंत्र तपासणी झाली पाहिजे, अशी मागणी पुढे येत आहे.भाड्याच्या उत्पन्नावरच संस्थेचा कारभार?

हे प्रश्न केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांचे नसून संस्थेच्या आर्थिक पारदर्शकतेशी संबंधित आहेत. संस्थेच्या मालकीची मालमत्ता ही सभासदांच्या विश्वासातून उभी राहिलेली सामूहिक संपत्ती असते. त्यामुळे तिच्या प्रत्येक व्यवहाराचा तपशील सभासदांना मिळणे आवश्यक आहे. इमारतीच्या बांधकामातील १० टक्के हिस्स्याचा मुद्दा चर्चेत संघाच्या मालमत्तेबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांमध्ये इमारतीच्या बांधकामाचा मुद्दाही महत्त्वाचा ठरत आहे. भागीदारी तत्त्वावर इमारतीचे बांधकाम करण्यात आले असताना संघाला केवळ १० टक्के बांधकामाचा हिस्सा मिळाल्याचा दावा केला जात आहे. प्रत्यक्षात अशा व्यवहारात ४० ते ५० टक्के हिस्सा अपेक्षित होता, असा संबंधितांकडून दावा करण्यात येत आहे.

आज संघाच्या इमारतीतील काही भागातून भाड्याचे उत्पन्न मिळत असल्याचे सांगितले जाते. या उत्पन्नाच्या आधारे संस्थेचा कारभार चालत असेल, तर शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष विकासासाठी संघाने कोणते उपक्रम राबवले, हा मूलभूत प्रश्न आहे. संघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कोणत्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या? शेतमाल विक्री, कृषी निविष्ठा, आर्थिक मदत, बाजारपेठ आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी कोणते प्रकल्प राबवण्यात आले? मागील पाच-दहा वर्षांतील कामकाजाचा अहवाल सभासदांसमोर ठेवण्यात यावा, अशी मागणी केली जात आहे. फिक्स्ड डिपॉझिट आहे, पण शेतकऱ्यांसाठी काय? संघाकडे फिक्स्ड डिपॉझिटच्या स्वरूपात ठेवी असल्याचे सांगितले जाते. या ठेवींची एकूण रक्कम किती आहे? कोणत्या बँकेत ठेवी आहेत? त्यावर वार्षिक किती व्याज मिळते? मिळणारे व्याज कोणत्या कामासाठी खर्च केले जाते? शेतकऱ्यांच्या हितासाठी या निधीतून कोणत्या योजना राबवण्यात आल्या? याचा तपशील सभासदांना उपलब्ध करून देण्याची गरज आहे. संस्थेकडे आर्थिक ठेवी असणे ही निश्चितच सकारात्मक बाब असू शकते. मात्र त्या ठेवींचा संस्थेच्या मूळ उद्देशाशी किती संबंध आहे, हे स्पष्ट होणे महत्त्वाचे आहे. केवळ ठेवी ठेवून आणि भाड्याचे उत्पन्न मिळवून संस्था चालवणे एवढेच कार्य उरले असेल, तर शेतकऱ्यांसाठी स्थापन झालेल्या संस्थेच्या भवितव्याचा गांभीर्याने विचार करावा लागेल. पाच वर्षे संचालक म्हणून काम केले; वारघडे पाटील यांचा अनुभव काय सांगतो? या संपूर्ण प्रकरणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे ते म्हणजे चंद्रकांत गोविंद वारघडे पाटील यांनी स्वतः संघाचे पाच वर्षे संचालक म्हणून काम केल्याचे सांगितले आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार, संचालक म्हणून काम करत असताना शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस आणि प्रत्यक्ष काम होत असल्याचे त्यांना जाणवले नाही. बैठकीला उपस्थित राहणे, कागदपत्रांवर सह्या करणे आणि नियमित बैठकींच्या औपचारिकतेपलीकडे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस काम होताना दिसले नाही, असा त्यांचा अनुभव आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे संघाच्या कार्यपद्धतीबाबत आणि मागील संचालक मंडळाच्या कामकाजाबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत मतदारांसमोर हिशेबाचा प्रश्न. हवेली तालुका खरेदी-विक्री संघाची निवडणूक जाहीर झाल्यानंतर आता उमेदवारांकडून मतदारांशी संपर्क साधला जात आहे. मात्र या निवडणुकीत केवळ पॅनेल, राजकीय समीकरणे आणि वैयक्तिक संबंध यांचाच विचार न होता संस्थेच्या मागील कारभाराचाही लेखाजोखा मांडला जाणे आवश्यक आहे. 1 निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या उमेदवारांनी संघाच्या मागील आर्थिक व्यवहारांबाबत आपली भूमिका स्पष्ट करावी. संस्थेच्या मालकीच्या मालमत्तांची सद्यस्थिती, मालमत्ता विक्रीचे व्यवहार, इमारतीतील हिस्सेदारी, भाडेकरार, फिक्स्ड डिपॉझिट आणि मागील लेखापरीक्षण अहवाल याबाबत सभासदांना माहिती देणे गरजेचे आहे.नवीन संचालक मंडळ निवडण्यापूर्वी मागील कारभाराचा हिशेब मिळणे आणि पुढील पाच वर्षांचा विकास आराखडा समजणे हा सभासदांचा अधिकार आहे. सहकार महर्षींच्या वारशाचे रक्षण कोण करणार? स्वर्गीय अण्णासाहेब मगर यांनी उभारलेल्या सहकार चळवळीचा पाया हा शेतकऱ्यांच्या विश्वासावर उभा होता. त्या विश्वासाला तडा जाऊ नये, यासाठी संस्थेचा कारभार पारदर्शक, जबाबदार आणि शेतकरीकेंद्रित असणे आवश्यक आहे. आज हवेली तालुका खरेदी-विक्री संघाच्या निवडणुकीच्या निमित्ताने उपस्थित झालेले प्रश्न हे केवळ एका निवडणुकीपुरते मर्यादित नाहीत. ते सहकार संस्थांच्या अस्तित्वाशी, त्यांच्या मूळ उद्देशाशी आणि शेतकऱ्यांच्या भवितव्याशी संबंधित आहेत. संघाच्या मागील आर्थिक व्यवहारांची निष्पक्ष तपासणी व्हावी, मालमत्तांचा संपूर्ण तपशील जाहीर करावा, फिक्स्ड डिपॉझिट आणि भाडे उत्पन्नाचा हिशेब सभासदांसमोर ठेवावा तसेच मागील संचालक मंडळाच्या कार्यकाळातील लेखापरीक्षण अहवाल सार्वजनिक करावेत, अशी मागणी या निमित्ताने पुढे येत आहे. ही निवडणूक केवळ संचालक निवडण्याची नाही, तर सहकार संस्थेच्या भवितव्याचा हिशेब मागण्याची संधी आहे. अण्णासाहेब मगर यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी उभ्या केलेल्या संस्थेचा मूळ उद्देश पुन्हा केंद्रस्थानी येणार का, की संस्था केवळ औपचारिक कारभारापुरती मर्यादित राहणार, याचे उत्तर आता आगामी संचालक मंडळाला आपल्या कामातून द्यावे लागणार आहे असे मतं सामाजिक कार्यकर्ते, वृक्षमित्र संस्थापक अध्यक्ष माहिती सेवा समिती चंद्रकांत गोविंद वारघडे पाटील यांनी मानले आहे.

चौफुला येथे वाहतूक कोंडीचा कहर

पोलीस प्रशासन मस्त, नागरिक त्रस्त!

■ वाहतूक कोंडीतून नागरिकांना मोकळा श्वास कधी मिळणार?
वाहतूक नियंत्रणासाठी ठोस उपाययोजनांची मागणी

■ दौंड (दै. संध्या)

दौंड तालुक्यातील चौफुला येथे पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील सुपा-शिरूर पुलाजवळ रविवार, दिनांक १५ नोव्हेंबर रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. चौफुला परिसरात दिवसेंदिवस वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनत चालली असून, वाहनचालकांसह स्थानिक नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. महत्त्वाचे वाहतूक केंद्र असलेल्या चौफुला येथे वाहनांची मोठी वर्दळ असतानाही वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. चौफुला परिसरात वारंवार वाहतुकीची कोंडी होत असल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. कामानिमित्त बाहेर पडलेले नागरिक, विद्यार्थी, प्रवासी, रुग्णवाहिका आणि व्यावसायिकांना याचा मोठा फटका बसत आहे. विशेष म्हणजे काही वाहनचालक आणि नागरिक स्वतः पुढाकार घेऊन वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. मात्र, वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी असलेल्या यंत्रणेची प्रभावी उपस्थिती दिसत नसल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. चौफुला परिसरात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्या, गुटखा विक्रीच्या संशयास्पद टपऱ्या, तसेच रस्त्यावर अडथळा निर्माण करणारे फळांचे हातगाडे यांच्यामुळे वाहतुकीच्या समस्येत भर पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. याशिवाय, काही पोलीस कर्मचाऱ्यांकडून अशा व्यावसायिकांकडून कथितरीत्या अवैध वसुली होत असल्याच्या चर्चाही परिसरात सुरू आहेत. या आरोपांची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. एकीकडे वाहतूक कोंडीमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना दुसरीकडे वाहतूक नियोजनाचा अभाव का? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून नियमित कर्मचारी तैनात केले जातात का, बेशिस्त पार्किंगवर कारवाई होते का आणि अवैध प्रवासी वाहतुकीवर नियंत्रण ठेवले जाते का, असे अनेक प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.



चौफुला येथील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नियमित वाहतूक पोलीस तैनात करणे, अवजड वाहनांचे नियोजन करणे, बेशिस्त पार्किंगवर कठोर कारवाई करणे, अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालणे आणि रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे आवश्यक आहे. या संपूर्ण प्रकाराकडे पुणे ग्रामीण पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. चौफुला येथील नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागणार का? पोलीस प्रशासनाला नागरिकांच्या समस्यांची दखल घेण्यासाठी आणखी किती काळ लागणार? की नागरिकांनी वाहतूक कोंडीतच आपला वेळ घालवायचा? पोलीस प्रशासन मस्त, नागरिक मात्र वाहतूक कोंडीत त्रस्त! आता तरी वरिष्ठ अधिकारी जागे होणार का, हा खरा प्रश्न आहे.



दहा वर्षापासून प्रलंबित असलेले ड्रेनेजचे काम प्रगतीपथावर

■ चाकण (दै. संध्या)

चाकण नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक तीन मधील कुसुम विहार व समर्थ कॉलनी या सोसायटीच्या ड्रेनेजचा प्रश्न गेले दहा वर्षापासून प्रलंबित होता. तो चाकण नगरपरिषदेच्या प्रथम महिला उपनगराध्यक्षा सुवर्णाताई राक्षे व नगरसेवक अनिल लोहकरे यांच्या प्रयत्नातून मार्गी लागले आहे. गेल्या अनेक वर्षापासून येथील नागरिकांना हा प्रश्न भेडसावत होता. परंतु अनेक अडचणी येत होत्या त्या सर्व सोडवून सुवर्णाताई राक्षे यांनी हे काम मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतला. या कामासाठी चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा मनिषाताई गोरे, गटनेते नगरसेवक नितीनभाऊ गोरे यांनी विशेष सहकार्य केले. तसेच या कामासाठी किरण कौटकर, श्रीकांत जाधव, शहाजी राक्षे, श्याम राक्षे यांचेही सहकार्य लाभले. हे काम व्हावे अशी कुसुम विहार व समर्थ कॉलनी येथील नागरिकांची आग्रही मागणी होती. त्या मागणीचा विचार करून सुवर्णाताई राक्षे यांनी पुढाकार घेऊन हे काम मार्गी लावले. हे काम मार्गी लावल्याबद्दल येथील रहिवासी अण्णासाहेब गीते, संदीप जायगुडे, सुभाष वाघमारे, मनोज आगरकर, विवेक गुप्ता आदींनी हे काम मार्गी लावल्याबद्दल आभार मानले व समाधान व्यक्त केले.

गुरोळीच्या शिवशक्ती ट्रस्टची पुरंदरमध्ये बाजी

■ नाझरे सुपे पुरंदर (दै. संध्या)



भक्तीला निसर्गाची जोड देत गणेशोत्सव साजरा करण्याचा पायंडा पाडणाऱ्या गुरोळीच्या शिवशक्ती सामाजिक सेवा ट्रस्टने पुरंदर तालुक्यात पहिला क्रमांक पटकावला आहे. राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२६ मध्ये ट्रस्टच्या पर्यावरणपूरक उपक्रमाची विशेष दखल घेण्यात आली. गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानंतर आयोजित या स्पर्धेत ट्रस्टने 'गणेशाची भक्ती करूया, निसर्गाचेही रक्षण करूया' हा संदेश घराघरांत पोहोचवला आणि शाडूच्या मातीच्या मूर्तींची स्थापना करण्याचे आवाहन करत उत्सवाला जबाबदारीची झालर दिली. ट्रस्टचे अध्यक्ष संतोष खेडेकर यांनी सांगितले, की या भागात पाऊस कमी असल्याने विहिरी, तलाव आणि इतर जलस्रोतांतील पाणीसाठा लवकर आटतो. "विसर्जनानंतर पाण्याची पातळी खाली गेली, की पीओपीच्या (प्लास्टर ऑफ पॅरिस) मूर्ती तळाशी उघड्या पडलेल्या दिसतात. त्या पाण्यात सहज विरघळत नाहीत. यामुळे श्रद्धेला ठेच पोहोचते आणि जलप्रदूषणाचा प्रश्नही गंभीर होतो," असे ते म्हणाले.

सासवड सांस्कृतिक मंडळाच्या स्पर्धेत एक हजारांहून अधिक स्पर्धकांचा सहभाग

■ सासवड (दै. संध्या)

डिजिटल युगाच्या आहारी गेलेल्या नव्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास आणि गडकिल्ल्यांचे महत्त्व समजावे, यासाठी सासवड सांस्कृतिक मंडळाच्या वतीने आयोजित किल्ले स्पर्धांना यंदाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. सलग २० व्या वर्षी सुरू असलेल्या या उपक्रमात पुरंदर आणि हवेली तालुक्यातील एक हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवल्याची माहिती मंडळाचे सचिव रवींद्रपंत जगताप यांनी दिली. दरम्यान, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांनी सार्वजनिक किल्ल्यांची पाहणी करत बालचमूंच्या कौशल्याचे मनापासून कौतुक केले.

माजी आमदार संजय जगताप यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या सासवड सांस्कृतिक मंडळाच्या वतीने गेल्या दोन दशकांपासून हा ऐतिहासिक वारसा जपण्याचा उपक्रम राबवला जात आहे. सासवड, जेजुरी, नीरा यांसह पुरंदरमधील विविध गावे, हवेलीतील फुरसुंगी तसेच सासवडच्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पुरंदर, हवेली आणि सातारा जिल्ह्यातील शाळांच्या गावांमध्ये ही स्पर्धा घेतली जात आहे. वैयक्तिक आणि सांघिक (ग्रुप) अशा दोन्ही गटांतून स्पर्धकांनी जलदुर्ग, डोंगरी आणि भुईकोट किल्ल्यांच्या हुबेहूब प्रतिकृती साकारल्या आहेत. यामध्ये रायगड, राजगड, पुरंदर, सिंहगड, मल्हारगड, प्रतापगड आणि जंजिरा यांसारख्या ऐतिहासिक किल्ल्यांचा समावेश आहे.



स्पर्धेच्या परीक्षणासाठी ५० गुणांचे निकष ठरवण्यात आले असून यामध्ये किल्ल्याची बांधणी, सजावट, कल्पकता, ऐतिहासिक माहितीचे सादरीकरण आणि परीक्षकांच्या प्रश्नांना दिलेली उत्तरे या बाबी तपासल्या जात आहेत. मंडळाचे सचिव रवींद्रपंत जगताप यांच्यासह अमित पवार, संजय काटकर, दीपक जगताप, जीवन कड, संदीप इनामके, स्नेहा शेवाळे, मनिषा कामथे आदी परीक्षक म्हणून काम पाहत आहेत. किल्ल्यांची माहिती सांगताना आणि ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या वतीने देण्यात येणारा चॉकलेट बॉक्स स्वीकारताना चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळत आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके आणि प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात येणार आहे. यामध्ये सार्वजनिक गटासाठी प्रथम क्रमांक ११ हजार, द्वितीय ७ हजार, तृतीय ५ हजार, चतुर्थ ४ हजार, पाचवा ३ हजार, सहावा २ हजार आणि सातवा १ हजार रुपये अशी बक्षिसे आहेत. तर वैयक्तिक गटासाठी अनुक्रमे ७ हजार, ६ हजार, ५ हजार, ४ हजार, ३ हजार, २ हजार आणि १ हजार रुपयांची पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.



बालदिनानिमित्त चिमुकल्यांना रामायण चित्रपटाची पर्वणी

■ सासवड (दै. संध्या)

ग्रामीण संस्थेच्या राजवर्धिनी जगताप यांचा उपक्रम

१४ नोव्हेंबर बालदिन आणि अनाथांची माय दिवंगत पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांची जयंती यांचे औचित्य साधून कुंभारवळण (ता.पुरंदर) येथील ममता बाल सदन या अनाथ आश्रमातील सुमारे शंभर बालके आणि कर्मचाऱ्यांसाठी ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या पुढाकारातून शनिवारी (ता .१४) एका विशेष स्नेहमेळाव्याचे आणि मनोरंजनाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व मुलांना पुण्यातील चित्रपटगृहात 'रामायण' चित्रपट दाखविण्यात आला. तसेच केक कापून बालदिन आणि सिंधुताईंची जयंती साजरी करण्यात आली. या उपक्रमामुळे चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला. मुलांना कुंभारवळण येथून पुण्यात सुखरूप ने-आण करण्यासाठी ग्रामीण संस्थेच्या वतीने स्वतंत्र वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. मुलांना नाष्टा देऊन 'रामायण' चित्रपटाचा आनंद घेतल्यानंतर भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. जेवणानंतर सर्व मुलांना चॉकलेट बॉक्स देऊन तोंड गोड करण्यात आले. सकाळपासूनच विविध उपक्रम राबविण्यात आले. याप्रसंगी ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, सिंधुताईंच्या कन्या ममता सपकाळ, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, ममता बाल सदन आश्रमाचे दीपक गायकवाड, गोपाल गायकवाड, मंजूषा गायकवाड यांच्यासह ग्रामीण संस्थेच्या सदस्या सुनिता कोलते तसेच तुषार जगताप, संदीप बांदल, सचिन काळे, सुरज शेवाळे, सुरज कुंभार, पूजा कुंभार आदी उपस्थित होते. संस्थेच्या या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दक्षिण पुणे जिल्हा पत्रकार संघाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

■ पुरंदर (दै. संध्या)

■ अध्यक्षपदी भोरचे सूर्यकांत किंद्रे
■ राजकुमार थोरात आणि प्रकाश फाळके यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती

दक्षिण पुणे जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी भोर येथील लोकमतचे प्रतिनिधी सूर्यकांत किंद्रे यांची नियुक्ती करण्यात येत असल्याची घोषणा अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शिवराज काटकर यांनी आज केली आहे. पुणे जिल्ह्याचा वाढता विस्तार आणि भौगोलिक अंतराचा विचार करून पुणे जिल्ह्याचे दक्षिण आणि उत्तर असे दोन जिल्हे करण्याचा निर्णय अ. भा. मराठी पत्रकार परिषदेनं घेतला आहे. उत्तर पुणे जिल्हा कार्यकारिणी यापुर्वी जाहीर करण्यात आली आहे.. दक्षिण पुणे जिल्हा कार्यकारिणी आज जाहीर करण्यात आली आहे. दक्षिण पुणे जिल्ह्यात बारामती, इंदापूर, दौड, पुरंदर, मुळशी, भोर, वेल्हे या तालुक्यांचा समावेश आहे. शिवराज काटकर यांनी आज जाहीर केलेल्या कार्यकारिणीत राजकुमार थोरात (इंदापूर-बारामती) आणि प्रकाश फाळके (पुरंदर) यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दौडचे जीवन शेंडकर हे सरचिटणीस म्हणून काम पाहतील. कोषाध्यक्ष म्हणून मुळशी येथील पत्रकार विनोद मांझिरे काम पाहतील.. जिल्हा प्रतोद म्हणून बंडू दातीर कार्यभार सांभाळतील. एम. जी. शेलार यांची परिषद प्रतिनिधी म्हणून फेरनियुक्ती करण्यात आली आहे तर राजेंद्र गवळी आणि दत्तात्रय भोंगळे यांना परिषदेच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. नवीन कार्यकारिणीची मुदत एक वर्षांची असून या वर्षात नव्याने सदस्य नोंदणी करावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती, डिजिटल मिडिया परिषद आणि महिला आघाडीच्या नियुक्त्या लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत. एस.एम. देशमुख, परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, परिषदेचे उपाध्यक्ष गणेश मोकाशी, माजी जिल्हा अध्यक्ष सुनील लोणकर, पुरंदर तालुका संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय भोंगळे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती अध्यक्ष बी.एम.काळे, योगेश कामथे, सचिव अमोल बनकर, कोषाध्यक्ष निलेश भुजबळ यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

बांधवगड येथे 'श्रीमती इंद्राणी बालन इंटरप्रिटेशन सेंटर'चे भूमिपूजन

वन कर्मचारी आणि वन्यजीव संरक्षणासाठी 'पुनीत बालन ग्रुप'कडून भरीव योगदान

■ पुणे (दै. संध्या)



बांधवगड व्याघ्र प्रकल्पातील ताला येथे 'श्रीमती इंद्राणी बालन इंटरप्रिटेशन सेंटर'चा भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न झाला. 'पुनीत बालन ग्रुप'च्या सहकार्याने या केंद्राची उभारणी करण्यात येत असून, वन्यजीव संवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि वन कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी ग्रुपकडून सातत्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. या भूमिपूजन सोहळ्याला आमदार मीना सिंह, पुनीत बालन, त्यांच्या सुविद्य पत्नी आणि माणिकचंद ऑक्सिरिचच्या सीएमडी जान्हवी धारिवाल-बालन, श्रीमती शोभा धारिवाल यांच्यासह वन विभागाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (विकास शाखा) बी. एस. अन्निगिरी, बांधवगड व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. अनुपम सहाय, उपसंचालक योहान कटारा, सहायक संचालक, ताला परिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी आणि वन कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय रिसॉर्ट असोसिएशन, गाइड असोसिएशन आणि जिप्सी असोसिएशनच्या प्रतिनिधींनीही या सोहळ्यात सहभाग घेतला.

'पुनीत बालन ग्रुप'कडून २०२१ पासून गेल्या पाच वर्षांपासून बांधवगड व्याघ्र प्रकल्पातील वन कर्मचारी आणि संबंधित घटकांच्या कल्याणासाठी सातत्याने मोठ्या प्रमाणात सहकार्य केले जात आहे. या अंतर्गत व्याघ्र प्रकल्पातील सुमारे १,१०० वन कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी, गाइड तसेच जिप्सी असोसिएशनचे सदस्य आणि चालकांचा जीवन विमा उतरवण्यात आला आहे. या विम्याचा वार्षिक सुमारे ३४ लाख रुपयांचा प्रीमियम 'पुनीत बालन ग्रुप'कडून भरला जात असून, आगामी दहा वर्षे ही जबाबदारी पार पाडली जाणार आहे. या उपक्रमामुळे वन कर्मचारी आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षितता मिळण्यास मदत होत असून, वन्यजीव संरक्षणाचे काम अधिक आत्मविश्वासाने करता येत आहे. याशिवाय व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीवांचे संरक्षण आणि गस्त व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पुनीत बालन यांच्याकडून तीन इसुझू वाहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या वाहनांची प्रक्रिया सुरू झाली असून, नोव्हेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत ही तिन्ही वाहने व्याघ्र प्रकल्प व्यवस्थापनाकडे सुपूर्द केली जाणार आहेत. पर्यावरण आणि वन्यजीव संवर्धनासाठी काम करणाऱ्या सहयोगी संस्था या व्याघ्र प्रकल्पाच्या व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. या संस्थांच्या सहकार्याने वन कर्मचारी आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांचे कल्याण साधण्याबरोबरच त्यांच्यासाठी सुरक्षित आणि अनुकूल कार्यवातावरण निर्माण करण्यावर बांधवगड व्याघ्र प्रकल्प व्यवस्थापनाचा भर आहे. वन्यजीवांचे संरक्षण, वन कर्मचाऱ्यांची सामाजिक सुरक्षा आणि पर्यावरण संवर्धन या क्षेत्रांत पुनीत बालन ग्रुपकडून सुरू असलेले सहकार्य या उपक्रमांच्या माध्यमातून अधिक बळकट होत आहे.

"वन्यजीव आणि निसर्गाचे संवर्धन ही केवळ वन विभागाची जबाबदारी नसून, ती आपल्या प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. जंगल आणि वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणारे वन कर्मचारी आणि सुरक्षा कर्मचारी हे या संवर्धन कार्याचे खरे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या कामाला सुरक्षिततेचं बळ मिळावं, त्यांच्या कुटुंबीयांना सामाजिक सुरक्षा मिळावी आणि वन्यजीव संरक्षणाचं कार्य अधिक सक्षम व्हावं, या उद्देशाने 'पुनीत बालन ग्रुप'च्या माध्यमातून यात योगदान देण्याची संधी आम्हाला मिळाली याचा विशेष आनंद आहे. भविष्यातही आमचं सहकार्य असंच सुरू राहील."

- पुनीत बालन, अध्यक्ष पुनीत बालन ग्रुप

"वन कर्मचारी आणि सुरक्षा कर्मचारी हे वन्यजीव आणि नैसर्गिक संपदेचे संरक्षण करण्याचं काम अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अहोरात्र करत असतात. त्यांच्या सुरक्षिततेसाठी जीवन विम्याची सुविधा, तसेच वन्यजीव संरक्षण आणि गस्त व्यवस्थेसाठी वाहनांची उपलब्धता करून देण्याचा पुनीत बालन ग्रुपचा उपक्रम निश्चितच मोलाचा आहे. अशा सहकार्यामुळे वन कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढण्यासोबतच वन्यजीव संरक्षणाच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळते. बांधवगड व्याघ्र प्रकल्पाच्या संवर्धन कार्यात पुनीत बालन ग्रुपने गेल्या पाच वर्षांपासून दिलेले सातत्यपूर्ण योगदान कौतुकास्पद असून, त्यांचे मनापासून आभार!"

- डॉ. अनुपम सहाय, (क्षेत्र संचालक, बांधवगड व्याघ्र प्रकल्प)